कर्मयोगी लोकमान्य टिळक

ग. प्र. प्रधान

चित्रे

संतोष गुप्ता

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

ISBN 81-237-2391-1

1998 (शके 1920)

© नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, 1998

Karmayogi Lokmanya Tilak *(Marathi)*

रु. 11.00

संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, ए-5, ग्रीन पार्क,
नवी दिल्ली-110016 यांनी प्रकाशित केले.

अनुक्रमणिका

विद्यार्थी-शिक्षक-संपादक

आपल्या आईवर आणि आपल्या जन्मभूमीवर सर्वांचे अत्यंत प्रेम असते. आईचे हाल आणि अपमान आपल्याला सहन होत नाही. त्याचप्रमाणे परकीयांच्या राज्यात मातृभूमीचा होणारा अपमान ही आपल्याला सहन होत नाही.

ब्रिटिशांचे जेव्हा भारतावर राज्य होते त्यावेळी भारतमातेची दुर्दशा झाली होती. एका वेळी धनधान्य विपुल असलेला आणि सर्व बाबतीत संपन्न असलेला आपला सुखी मायदेश पारतंत्र्यात कमालीचा दरिद्री आणि दु:खी झाला होता आणि वाईट म्हणजे, लोक दुबळेपणाने सारे काही सहन करीत होते.

अशा वेळी सर्वसामान्य माणसांचा स्वाभिमान जागृत करून त्यांना 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे.' हा मंत्र शिकविण्याचे महान कार्य लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी केले. त्यांनी भारतीय जनतेचे मन घडविले म्हणून त्यांना 'भारताचे शिल्पकार' म्हणतात. लो. टिळकांच्या चरित्रातून आजही आपल्याला देशभक्तीची प्रेरणा मिळेल.

देशसेवेचा संकल्प

महाविद्यालयामध्ये विद्यार्थी असतानाच टिळकांच्या मनात देशभक्ती जागृत झाली होती. त्यांच्या बरोबर पुण्याच्या डेक्कन कॉलेजमध्ये शिकणाऱ्या गोपाळ गणेश आगरकर या त्यांच्या मित्राला मातृभूमीबद्दल

असेच प्रेम वाटत होते. या दोन हुशार विद्यार्थ्यांना आपण उत्तम रीतीने बी.ए. ची पदवी मिळवू अशी खात्री होती. परंतु त्यानंतर मोठ्या पगाराची सरकारी नोकरी न करता देशाच्या स्वातंत्र्यासाठी कार्य करण्याचा निर्धार या दोन ध्येयवादी तरुणांनी केला.

हे प्रयत्न कसे व कोणत्या मार्गाने करावयाचे याबद्दल दोघेजण एकमेकांशी चर्चा करीत. दोघांची मते सारखी नव्हती परंतु दोघांचे देशसेवा करण्याचे ध्येय मात्र एकच होते.

शिक्षण

टिळकांचा जन्म 1856 मध्ये जुलै महिन्याच्या 23 तारखेला रत्नागिरी येथे झाला. त्यांचे नाव 'केशव' असे ठेवण्यात आले, तरी 'बाळ' हे त्यांचे टोपणनावच कायम टिकले. त्यांचे वडील गंगाधरपंत शिक्षणखात्यात नोकरीस होते. याच सुमारास ते असिस्टंट डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर होऊन पुण्यास आले. टिळकांची आई लवकर वारल्यामुळे त्यांचे संगोपन चुलतीनेच केले.

पुण्यास आल्यावर ते हायस्कूलमध्ये जाऊ लागले. वडिलांनी लहानपणीच त्यांच्याकडून भरपूर पाठांतर करून घेतले. तसेच संस्कृत आणि गणित या दोन विषयांचीही उत्तम तयारी करून घेतली.

टिळकांचे वडील 1872 साली वारले. त्या वेळच्या पद्धतीप्रमाणे इंग्रजी शाळेत असतानाच, 1871 साली टिळकांचे लग्न झाले. सोळाव्या वर्षी मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण होऊन टिळक पुण्याच्या डेक्कन कॉलेजमध्ये उच्च शिक्षणासाठी गेले. वडिलोर्जित मालमत्ता फार मोठी नसली तरी वडिलांनी ठेवलेल्या पैशांमुळे टिळकांना पदवीधर होईपर्यंत कोणतीही अडचण सोसावी लागली नाही.

शाळेत आणि कॉलेजमध्येही कुशाग्र बुद्धी आणि विस्तृत वाचन यांमुळे हुशार विद्यार्थी म्हणून टिळक ओळखले जात. 1876 साली टिळक बी.ए. ची परीक्षा गणित विषय घेऊन पहिल्या वर्गात उत्तीर्ण झाले. नंतर एम्.ए. चा अभ्यास अर्धवट टाकून ते 1879 साली एल्.एल.बी. झाले.

आगरकरांची परिस्थिती गरिबीची होती. परंतु त्यांच्या मनाला त्याची क्षिती वाटत नव्हती. त्यांनी आईला पत्रात लिहिले, 'आपल्या मुलाच्या मोठाल्या परीक्षा होत आहेत, आता त्याला मोठ्या पगाराची चाकरी लागेल व आपले पांग फिटतील, असे मोठाले मनोरथ आई, तू करीत असशील. पण मी आताच तुला सांगून ठेवतो की, विशेष सुखाची हाव न धरता मी फक्त पोटापुरत्या पैशावर संतोष मानून सर्व वेळ परहितार्थ खर्च करणार.'

देशहितार्थ काय करावे यासंबंधी या दोन तरूण मित्रांमध्ये काही मतभेद होते. टिळकांना असे वाटत होते की आधी राजकीय कार्य करून देश स्वतंत्र व्हावा यासाठी नेटाने प्रयत्न करावेत.

या उलट आगरकरांचे मत असे होते की देशाला स्वातंत्र्य मिळणे फार महत्त्वाचे असले तरी आधी सामाजिक कार्य करून आपल्या समाजात सुधारणा घडवून आणावी आणि नंतरच राजकीय कार्याकडे वळावे.

टिळक गणिताचे विद्यार्थी होते तर आगरकरांचा तत्त्वज्ञान हा खास विषय होता. दोघांनीही पाश्चात्य विचारवंतांचे विचार वाचले होते आणि मिल व स्पेन्सर या दोन विचारवंतांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्या मनावर होता.

शैक्षणिक कार्य

शुष्क चर्चेत टिळक व आगरकर या दोघांनाही रस नव्हता. जो

विचार पटेल त्याप्रमाणे कृती केली पाहिजे असे दोघांनाही वाटत होते. अनेक दिवस अर्थपूर्ण वादविवाद केल्यानंतर टिळक आणि आगरकर या दोघांनाही असे वाटू लागले की राजकीय किंवा सामाजिक कार्य करण्यापूर्वी सर्व कामांना पायाभूत असे शिक्षणाचे कार्य केले पाहिजे. ही केवळ तडजोड नव्हती. वास्तववादी दृष्टिकोनातून टिळक व आगरकर यांनी हा महत्त्वाचा निर्णय घेतला होता.

यातूनच 2 जानेवारी 1880ला पुण्यामध्ये न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना करण्यात आली आणि टिळकांच्या जीवनातील नवे पर्व सुरू झाले.

शिक्षणक्षेत्रातील याच्या पुढचे पाऊल म्हणून 24 ऑक्टोबर 1884 ला डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना करण्यात आली. यानंतर अल्पकाळातच पुण्याला 2 जानेवारी 1885 ला फर्ग्युसन कॉलेज सुरू करण्यात आले. हे कॉलेज सुरू झाल्यामुळे टिळक व आगरकर यांचे उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात काम करण्याचे स्वप्न प्रत्यक्षात आले.

उत्तम अध्यापन करून तरुण विद्यार्थ्यांना ज्ञान देणे आणि ज्ञानोपासना करण्याची आवड त्यांच्यात निर्माण करणे हे काम महत्त्वाचे तर खरेच, परंतु चिपळूणकर, आगरकर आणि टिळक यांना केवळ अध्यापन-क्षेत्रात काम करणे पुरेसे वाटत नव्हते.

लोकशिक्षण

आपल्या देशाची स्थिती कशी आहे हे लोकांना समजावून त्यांच्या मनात देशभक्ती जागृत करणे आणि ही परिस्थिती सुधारण्यासाठी काय केले पाहिजे हे त्यांना शिकविणे, ही उद्दिष्टे डोळ्यांसमोर ठेवून चिपळूणकर, आगरकर आणि टिळक हे एकत्र आले होते.

लोकशिक्षणाचे कार्य करण्यासाठी वर्तमानपत्र हे एक प्रभावी साधन आहे याची जाणीव असल्यामुळे वर्तमानपत्र सुरू करण्यासंबंधी या ध्येयवादी मित्रांच्यांत विचारविनिमय सुरू झाला आणि शैक्षणिक कार्य सुरू असतानाच 'केसरी' आणि 'मराठा' ही वर्तमानपत्रे टिळक आणि आगरकरांनी पुढाकार घेऊन सुरू केली.

केसरी वर्तमानपत्र

'केसरी' हे मराठीतील साप्ताहिक अल्पावधीतच महाराष्ट्रात सर्वत्र जाऊ लागले. आगरकर आणि टिळक यांच्या लेखांमुळे जनतेचे प्रबोधन होत होते. राजकीय प्रश्नांवर या दोन संपादकांमध्ये एकमत होते कारण दोघेही स्वातंत्र्यवादी होते. परंतु पुढे सामाजिक प्रश्नांवर त्यांच्यामध्ये मतभेद होऊ लागले.

आगरकर सामाजिक सुधारणांचा पुरस्कार करीत असतांना टिळकांची भूमिका सामाजिक प्रश्नांवर परंपरावादी होती. या मतभेदांमुळे अखेर आगरकरांनी 'केसरी' चे संपादकत्व सोडले आणि सामाजिक सुधारणांचा पुरस्कार करण्यासाठी त्यांनी 'सुधारक' हे वर्तमानपत्र काढले.

टिळक आणि आगरकर यांच्यातील हे मतभेद फर्ग्युसन कॉलेजच्या कामातही होऊ लागले. अखेर टिळकांनी फर्ग्युसन कॉलेज आणि डेक्कन एज्युकेशन सोसायटीचा राजिनामा दिला व ते केसरीच्या संपादकत्वाचे काम पूर्णवेळ करू लागले.

जहाल पत्रकार आणि झुंजार राजकारणी

1890 ते 1897 या सात वर्षांत देशाच्या आणि मुख्यतः महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनातील वेगवेगळ्या प्रसंगातून जाताना आपल्याला नेमके काय करावयाचे आहे आणि काय करता येईल याचा अंदाज टिळकांना आला. त्या प्रसंगांच्या वेळी टिळकांनी घेतलेल्या भूमिकांमुळे हळूहळू त्यांच्या नेतृत्वास समाजाची मान्यता मिळाली.

या कालखंडात 1893 साली हिंदू-मुसलमानांचे दंगे झाले. या वेळी टिळकांनी निर्भयपणे स्वाभिमानी आणि निःपक्षपाती भूमिका 'केसरी' तून मांडली.

या संदर्भात टिळक लिहितात: 'हिंदू व मुसलमानांच्या दंग्याची कारणे पाहातेवेळी, हिंदू आणि मुसलमान असे दोनच पक्ष आहेत असे सकृद्दर्शनी वाटणे साहजिक आहे... परंतु जरा सूक्ष्म विचार केला असता प्रत्येक विचारी मनुष्यास असे आढळून येईल की हिंदू, मुसलमान आणि सरकार असे तीन पक्ष लक्षात घेतल्याखेरीज दंग्याच्या कारणांची नीट उपपत्ती लागत नाही.'

टिळकांनी स्पष्टपणे असे सांगितले की हिंदू व मुसलमान या दोनही समाजांना आपापल्या धर्माप्रमाणे वागता आले पाहिजे.

महाराष्ट्रात ज्या गावी दंगे झाले तेथे टिळक स्वतः गेले आणि ब्रिटिश कलेक्टरांच्या पक्षपातीपणाची उदाहरणे त्यांनी जाहीरपणे मांडली. या त्यांच्या निर्भय कृतीमुळे लोकांच्या मनात त्यांच्याबद्दल आदराची भावना निर्माण झाली.

राष्ट्रीय उत्सव

टिळकांचे या कालातील लेख वाचल्यावर, लोकांमध्ये प्रत्यक्ष जाऊन कार्य केल्याशिवाय आणि त्यांना विविध मार्गांनी संघटित केल्याशिवाय राजकीय चळवळ पुढे जाणार नाही, हा त्यांचा विचार पक्का होत चालल्याचे दिसून येते.

या दिशेने त्यांनी सुरू केलेल्या प्रयत्नांचा एक भाग म्हणजे गणपतीउत्सवास त्यांनी दिलेले सार्वजनिक स्वरूप हा होय. समाज उत्सवप्रिय असतो, हे टिळकांनी बरोबर ओळखले होते आणि या प्रवृत्तीस विधायक वळण देऊन लोकशिक्षणाचे एक व्यासपीठ निर्माण व्हावे अशीही त्यांची इच्छा होती.

या सार्वजनिक गणेशोत्सवात गाणी म्हणणारे मेळे, लेझीमची पथके, यांजबरोबरच लोकशिक्षणासाठी विविध विषयांवर व्याख्यानेही व्हावीत अशी प्रथा टिळकांनी पुण्यात रूढ केली. महाराष्ट्रात अनेक गावी या प्रथेचे अनुकरण होऊन टिळकांना अपेक्षित असलेले लोकशिक्षणाचे व्यासपीठ निर्माण होऊ लागले.

राष्ट्रपुरुष छत्रपती शिवाजी महाराजांचा उत्सव सुरू करून टिळकांनी यापेक्षाही फार महत्त्वाचे पाऊल टाकले.


या संबंधीची टिळकांची भूमिका 28 एप्रिल 1896 च्या केसरीतील 'शिवजयंतीचा राष्ट्रीय उत्सव' या अग्रलेखात पुढील शब्दांत व्यक्त झाली आहे:

'ज्या शूर पुरुषांनी आपल्या देशाचे नाव इतिहासात अजरामर केले, त्यांच्या कृत्याचे कितीही अभिनंदन केले, तरी त्यांच्या ऋणातून सर्वस्वी मुक्त होणे कठीण आहे. श्रीशिवछत्रपती महाराजांचा उत्सव करण्यात त्यांजबद्दलची आपल्या अंगात वसत असलेली कृतज्ञता व्यक्त करणे हेच कारण होय... राष्ट्रातील महापुरुषांचे स्मरण हे राष्ट्रीयत्व कायम राखण्यास एक चांगले साधन आहे...'

शिवछत्रपतीच्या उत्सवात लोकांनी आपसातील सर्व भेद विसरले पाहिजेत असे टिळकांनी सतत सांगितले. अमरावती येथे केलेल्या भाषणात टिळकांनी आपली शिवचरित्रविषयक दृष्टी स्पष्ट मांडली आहे.

ते म्हणतात, 'जो प्रगती व्हावी अशी इच्छा करतो तो साधू व प्रगतीस अडथळा करतो तो दुष्ट समजला पाहिजे. छत्रपती शिवाजीने आमच्या प्रगतीच्या आड येणारे अडथळे काढून टाकून मार्ग मोकळा केला. त्याचा उद्देश अफझुलखानास मारण्याचा नव्हता, तर तत्कालीन प्रगतीच्या आड येणाऱ्या विघ्नाचे निवारण करण्याचा होता. केवळ मुसलमान म्हणून त्याला मारण्याचा हेतू असता तर शिवाजीने खानाच्या बायकोला दागिने वगैरे देऊन विजापुरास पाठविली नसती...

'प्रत्येकाने जातीकडे व धर्माकडे न पाहाता सर्व राष्ट्राकडे पाहिले पाहिजे... अशा प्रकारची राष्ट्रीय कामगिरी स्वकालीन कर्तव्याच्या दिशेने छत्रपती शिवाजीनेच केली. त्यावेळची आमच्या



लोकांची स्थिती ओळखून व तत्कालीन संकटांतून सोडवून आम्हांस प्रगतीच्या मार्गास त्याने लावले.'

समाजात ताणतणाव निर्माण झाले असताना निर्भयपणे आपली बाजू मांडून प्रतिपक्षावर मात करणे आणि नवे लोकजागृती-उत्सव सुरू करणे या कामगिरीमुळे टिळकांची लोकप्रियता वाढली. 1893 ते 1895 या काळात पुणे म्युनिसिपालिटीचे सदस्यत्व, मुंबई विद्यापीठाचे फेलो आणि कायदे कौन्सिलचे सभासदत्व अशा तीनही जागावर टिळक निवडून आले.

लोकशक्ती

1876-77 साली पडलेल्या दुष्काळानंतर सरकारने 'फॅमिन रिलीफ कोड' पास केले आणि त्यामध्ये दुष्काळपीडित जनतेस सरकार काय व कसे साहाय्य करील याचे नियम ठरवून दिले. त्यांमध्ये मुख्यत: शेतसाऱ्याच्या वसुलीबाबत शेतकऱ्यांना कोणत्या सवलती मिळतील हे दिले होते. सरकारने पास केलेल्या नियमांची अंमलबजावणी करावयास सरकारला भाग पाडावयाचे असे ठरवून टिळकांनी कामास सुरुवात केली. प्रथम त्यांनी फॅमिन रिलीफ कोडचे मराठी भाषांतर लोकांना मिळावे अशी सरकारकडे मागणी केली.

ती सरकारने फेटाळताच टिळकांनी 'केसरी' मधून फॅमिन रिलीफ कोडचे संक्षिप्त भाषांतर छापले आणि त्याच्याच पुस्तिका करून सार्वजनिक सभेच्या कार्यकर्त्यांच्या द्वारा वेगवेगळ्या जिल्ह्यांतून पाठविल्या. वस्तुत: यात बेकायदेशीर काहीच नव्हते. परंतु या पुस्तिकेतील 'कर्ज काढून सारा भरू नका' या वाक्याच्या आधारे ठाणे व कुलाबा जिल्ह्यातील कलेक्टरांनी सार्वजनिक सभेच्या कार्यकर्त्यांवर खटले भरले.

कुलाबा जिल्ह्यातील पेण येथे सार्वजनिक सभेचे कार्यकर्ते प्रा. परांजपे यांच्यावर खटला भरण्यात आला. हे समजताच कलकत्ता येथे काँग्रेसच्या अधिवेशनास गेलेले टिळक तात्काळ परत आले आणि पेण येथे गेले.

ब्रूक या मॅजिस्ट्रेटसमोर हा खटला चालणार होता. टिळक तेथे येताच प्रचंड जनसंमर्द जमला आणि त्याने 'टिळक महाराज की जय' अशा घोषणा देण्यास सुरुवात केली. त्यांना गप्प करणे पोलिसांना जमेना तेव्हा ब्रूक यांनी टिळकांना विनंती केली. टिळकांनी सांगितल्यावर लोक शांत झाले. खटल्यात प्रो. परांजपे दोषमुक्त होऊन सुटले.

ब्रूक यांनी नंतर टिळक यांना बोलाविले आणि त्यांनी पुढील आशयाचे उद्गार काढले, 'शेतकरी वर्गातील अशिक्षित लोकांचा इतका प्रचंड जमाव एखाद्या खटल्याच्या निमित्ताने जमल्याचे उदाहरण हिंदुस्थानात तर माझ्या पाहण्यात नाहीच, पण इंग्लंडमध्येही नाही.'

कायद्याच्या चौकटीत राहूनही सरकारवर दबाव कसा आणता येतो हे टिळकांनी दाखवून दिले. फॅमिन रिलीफ कोडच्या प्रती वाटल्याबद्दल कार्यकर्त्यांवर सरकार खटला भरते तर हे कोड छापण्याबद्दल केसरीच्या संपादकावर दहा वेळा खटला भरावयास हवा, असा आव्हानात्मक पवित्रा टिळकांनी घेतला.

कायद्याच्या चौकटीत लिहितानाही टिळक लोकांना निर्भय बनविण्यासाठी किती प्रखर भाषा वापरीत हे केसरीच्या अग्रलेखातील पुढील उताऱ्यावरून समजून येईल. टिळक लिहितात:

'हे दिवस दांडगाईचे नाहीत, कायद्याचे आहेत, हे रयत व सरकारी अंमलदार या दोघांनीही लक्षात ठेवले पाहिजे. अमुक आणे पीक बुडाल्यास साऱ्याची तहकुबी अगर माफी मिळेल असा कायदा

आहे तर सरकारी अधिकाऱ्यांनी लोकांस ती माफी अवश्य दिली पाहिजे व लोकांनीही ती निश्चयाने पण शांततेने आग्रहपूर्वक मागून घेतली पाहिजे... एका हातात फॅमिन रिलीफ कोड, दुसऱ्या हातात अर्ज आणि मनात त्याप्रमाणे वागण्याचा निश्चय अशी जेव्हा रयतेची स्थिती होईल तेव्हाच त्यांची दुष्काळात दाद लागेल.'

नेमस्तांच्या कार्यपद्धतीप्रमाणे गोखले हे सार्वजनिक सभेचे सेक्रेटरी असताना लोकांच्या गाऱ्हाण्यांबद्दल सरकारला निवेदने दिली जात. टिळकांच्या नेतृत्वाखाली सभेतर्फे अशी निवेदने दिली गेलीच. परंतु तेथेच न थांबता या निवेदनामागे जनतेची ताकद टिळकांनी उभी केली आणि या ताकदीच्या जोरावर दुष्काळात सरकारला नमविले.

जहाल राजकारण याचा अर्थ जहाल शब्द असे टिळकांना अभिप्रेत नव्हते. टिळकांचे शब्द रोखठोक आणि स्पष्ट असत. त्या शब्दांमधून लोकांना निर्भय बनण्याची शिकवण दिलेली असे. शब्दांना लोकांच्या सामर्थ्याचे अधिष्ठान असले पाहिजे हा टिळकांच्या जहाल राजकारणाचा अर्थ होता.

प्लेगची आपत्ती

1897 साली पुणे शहरावर प्लेगच्या साथीची आपत्ती कोसळली. त्यावेळी प्लेग प्रतिबंधक इंजेक्शनही उपलब्ध नव्हते. त्यामुळे साथीमध्ये अनेक लोक मृत्युमुखी पडले. साथीला आळा घालण्यासाठी प्लेग झालेल्या रोग्यास हॉस्पिटलमध्ये पोहोचविणे, त्याच्या घराची साफसफाई करून तेथे राहणाऱ्यांना गावाबाहेर मोकळ्या व स्वच्छ जागी राहावयास पाठविणे, आदी उपाययोजना करण्याचे काम सरकारने रँड या असिस्टंट कलेक्टरकडे सोपविले आणि त्याने ते गोऱ्या व काळ्या लष्करी शिपायांच्या मदतीने धसमुसळेपणाने चालविले.

या शिपायांनी लोकांच्या घरातील भांडी फेकून देणे, देवादिकांच्या मूर्तीचीही विटंबना करणे असे प्रकार केल्यामुळे लोक त्रासून आणि संतापून गेले. लष्करी शिपायांनी स्त्रियांशी जे गैरवर्तन केले त्याविरुद्ध थोर समाजसेविका पंडिता रमाबाई यांनीही अतिशय रागावून लिहून या गैरकृत्यांचा निषेध केला.

लोकांवरील संकट ही नेत्याची कसोटी असते. टिळकांनी या आपत्तीत लोकांना धीर दिला. सुरुवातीस 'बंदोबस्ताबद्दल रिकाम्या शंका घेत राहणे हे असमंजसपणाचे लक्षण आहे,' असे टिळकांनी केसरीत लिहिले. त्यावेळी सरकारी प्रयत्नांस सहकार्य द्यावयाचे हीच त्यांची भूमिका होती. परंतु नंतर मात्र 'विनाकारण त्रास व जुलूम यांस रोगापेक्षाही लोक जास्त भीत आहेत' असे लिहून टिळकांनी लोकांच्या गाऱ्हाण्यांना वाचा फोडली.

प्लेगच्या रोग्याने हॉस्पिटलमध्ये गेले पाहिजे असे सांगतानाच लोकांना सरकारी हॉस्पिटलची भीती वाटत असेल तर त्यांना दुसरे हॉस्पिटल असावे असे ठरवून टिळकांनी काही लोकांच्या मदतीने खासगीरित्या दुसरे प्लेग हॉस्पिटल काढले. त्याचप्रमाणे अन्य बाबतीत लोकांना साहाय्य करण्याकरिता टिळकांनी पुढाकार घेऊन रिलीफ कमिटी स्थापन केली.

प्लेगची आपत्ती फारच भीषण होती. तरीही त्यावेळी टिळक निर्भयपणे लोकांमध्ये काम करीत त्यांना धीर देत होते, रोग्याने हॉस्पिटलमध्ये गेले पाहिजे असे समजावून सांगत होते आणि सरकार जेथे चुकेल तेथे सडेतोडपणे टीकाही करीत होते.

दुःखात असताना लष्करी शिपायांकडून भावना दुखावल्यामुळे अनेकांना फार राग आला. परंतु सत्तेपुढे शहाणपण चालत नसल्यामुळे लोक हा अपमान गिळत होते. काही तरुण मंडळीच्या मनातील क्षोभ धुमसत राहिला. सरकारला धडा शिकवावा लागेल असे त्यांना वाटू

लागले आणि या दृष्टीने ते तयारी करू लागले.

मे 1897 च्या सुमारास साथीचा जोर ओसरल्यावर नेहमीप्रमाणे सार्वजनिक जीवनही सुरू झाले. 12 जून हा शिवराज्याभिषेकाचा दिवस होता. त्या निमित्ताने प्रवचन व व्याख्यान असा कार्यक्रम होता. प्रा. भानू या इतिहासाच्या प्राध्यापकांचे भाषण झाले. भानू अफजलखानाच्या वधावर बोलले आणि याबाबतीत शिवाजी महाराजांना दोष देता येणार नाही अशी भूमिका त्यांनी मांडली. टिळकांनी अध्यक्षपदावरून या भूमिकेस मान्यता देताना या कृत्यामागील शिवाजी महाराजांच्या सात्विक बुद्धीचा उल्लेख केला.

15 जूनच्या केसरीच्या अंकात भानूंच्या व्याख्यानाचा सारांश प्रसिद्ध झाला. या भाषणाचा आणि एका आठवड्यानेच घडलेल्या घटनेचा काहीही संबंध नव्हता. परंतु टिळकांच्या वाढत्या राजकीय प्रभावामुळे संतप्त झालेली नोकरशाही व ब्रिटिश सरकार त्यांच्यावर प्रहार करण्यासाठी टपून बसली होती; आणि टिळकांच्या चिथावणीमुळेच लोकांच्या मनात राजद्रोहाची भावना निर्माण होते असा आरोप करण्याची संधी या निमित्ताने सरकारने साधली.

व्हिक्टोरिया राणी राज्यावर आल्यास साठ वर्षे पूर्ण झाली होती. या हीरक महोत्सवाच्या निमित्ताने 22 जूनला गव्हर्नर साहेबांनी गणेशखिंडीवर एक मोठा समारंभ व मेजवानी आयोजित केली होती. 22 जूनला या सरकारी मेजवानीस रँड हा हजर होता.मेजवानी आटोपून अधिकारी मंडळी परतू लागली. लेफ्टनंट आयर्स्ट याची घोडागाडी परतत असताना एका तरुणाने गाडीवर उडी मारून आयर्स्ट यास गोळी घातली आणि तो जागीच गतप्राण झाला.

त्याच्या मागोमाग रँड साहेबाची गाडी येताच दुसऱ्या तरुणाने गाडीच्या मागच्या फळीवर उडी मारली आणि रँडच्या पाठीतून सरळ

गोळ्या झाडल्या. गोळ्या फुफ्फुसात घुसून रँड तडफडत असतानाच त्याला हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. असे काही घडेल याची सरकारी अधिकाऱ्यांना अगर पोलिसांना कल्पनाही नव्हती. याचे कारण हे कृत्य करणाऱ्या तरुणांनी त्यासाठी दीर्घकाल तयारी केली होती.

चापेकर क्लब

पुण्याजवळ चिंचवड या गावी राहणारे चापेकर बंधू, रानडे व आणखी काही तरुण यांनी एक गुप्त संघटना सुरू केली होती. या संघटनेचे नाव चापेकर क्लब असे होते. पारतंत्र्यामुळे होणाऱ्या मानखंडनेमुळे हे तरुण अतिशय क्षुब्ध झाले होते. त्यांच्यापैकी दामोदर चापेकर हा व्यायामपटू होता आणि त्याला सैन्यात जावयाचे होते. परंतु त्याला सैन्यात प्रवेश नाकारण्यात आला होता. प्लेगच्या साथीत गोऱ्या सोल्जरांनी केलेल्या जुलमामुळे संतप्त झालेल्या चापेकर क्लबमधील तरुणांनी ब्रिटिश सरकारला व गोऱ्या अधिकाऱ्यांना धडा शिकविण्याचा निर्धार केला.

प्लेगच्या आपत्तीत पुणे शहर होरपळून निघाले असताना राणीच्या राज्याच्या हीरक महोत्सवानिमित्त मेजवानी देणे हे जखमेवर मीठ चोळण्यासारखे आहे असे या तरुणांना वाटले आणि त्यांनी त्या रात्रीच रँडचा खून करण्याचे ठरविले. त्याप्रमाणे दामोदर चापेकरने रँडला गोळी घातली. बाळकृष्ण चापेकरच्या गोळीस ले. आयर्स्ट बळी पडला. गणेशखिंडीच्या निर्मनुष्य रस्त्यावर रात्रीच्या वेळी ठरविलेले कृत्य करून चापेकर बंधू आडरस्त्याने निघून गेले.

रँड व आयर्स्ट यांचे खून ही एक धक्कादायक घटना होती. देशभर आणि विशेषतः पुण्यात या घटनेमुळे एकच खळबळ उडाली. ब्रिटिश सरकार या खुनांमुळे हादरूनच गेले. ताबडतोब

चौकशीसाठी खास अधिकारी नेमण्यात आले आणि गुन्हेगारांस पकडण्यासाठी वीस हजार रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले. आरोपीचा छडा लावण्यासाठी पोलिसांनी धाकदपटशा सुरू केला आणि अनेकांना चौकशीसाठी पकडण्यात आले.

मुंबईच्या टाइम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्राने, 'पुण्याच्या ब्राह्मणांनी ब्रिटिश सरकार उलथून टाकण्याचा कट केला आहे' असा आरोप केला. टिळकांनी केसरीत अग्रलेख लिहून खुनाचा धिक्कार केला. परंतु सरकारच्या दमनचक्राखाली अनेक निरपराध माणसे भरडली जात आहेत हेही सरकारच्या नजरेस आणून दिले.

पुण्याचे कलेक्टर लॅम्ब यांनी 28 जूनला प्रतिष्ठित नागरिकांची सभा बोलावून सरकारची सत्ता अमर्याद आहे आणि गुन्हेगारांना शोधण्यासाठी दडपशाही करावी लागेल अशी धमकावणीची भाषा वापरली. तेव्हा टिळकांनी 'असल्या प्रसंगात प्रत्येक मनुष्याने पोलिसास मदत केली पाहिजे,' असे लिहितानाच 'सरकारी सामर्थ्याची गोष्ट लॅम्ब साहेबांनी लोकांसमोर सांगण्यात आपला उद्दामपणा व शिरजोरपणा मात्र व्यक्त केला आहे,' असे स्पष्टपणे लिहिले.

टिळकांनी सरकारला इशारा देताना, 'राज्य करणे म्हणजे सूड उगविणे नव्हे' असा अग्रलेख लिहिला आणि लोकांचे नीतिधैर्य खचू नये यासाठी सतत निर्भय भूमिका घेतली.

रँडच्या खुनाचा तपास करण्यासाठी ब्रुइन या खास अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात आली. रँडचे खुनी व टिळक यांचे निकटचे संबंध होते असा पुरावा उभा करून टिळकांनाही या खटल्यात गुंतवावे असा सरकारचा डाव होता. असा पुरावा मिळविण्यासाठी ब्रुइनने जंगजंग पछाडले परंतु टिळकांचा चापेकर बंधुंशी प्रत्यक्ष संबंध नसल्यामुळे ब्रुइनला कोणताच पुरावा मिळू शकला नाही. टिळक व चापेकर बंधू यांचा थोडा जरी संबंध असता तरी ब्रुइनने त्याचा छडा

लावला असता आणि सरकारने ताबडतोब टिळकांच्या गळ्याभोवती पाश आवळले असते.

राजद्रोहाचा खटला

टिळकांनी केसरीतून खुनाचा तीव्र निषेध केला. परंतु त्याचबरोबर हा खून घडण्याइतकी काही जणांची माथी का भडकली यासंबंधी लिहिताना त्यांनी प्लेगच्या कहरात ब्रिटिश अधिकाऱ्यांनी केलेल्या असह्य व अनावर जुलुमांचा पाढाही वाचला.

खुनाच्या तपासासाठी पोलिसांची जुलूम जबरदस्ती वाढतच चालली तेव्हा टिळकांनी निर्भयपणे, 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय' असा अग्रलेख लिहिला. टिळकांच्या लेखणीच्या या फटकाऱ्यामुळे सरकार चवताळून गेले आणि 29 जुलै 1897 ला राजद्रोहाच्या आरोपाखाली टिळकांना अटक करण्यात आली. शिवाजीउत्सवात टिळकांनी जे भाषण केले होते त्यात सरकार विरुद्ध असंतोष निर्माण करण्याचा हेतू होता हे कारण देऊन राजद्रोहाच्या आरोपाखाली टिळकांवर सरकारने खटला भरला.

प्रत्यक्ष खटला सुरू होण्यापूर्वी 'टिळकांनी माफी मागावी' असा काही जणांनी सल्ला दिला. पण माफी ही शरणागती असल्यामुळे टिळकांनी तो सल्ला झिडकारला. या संदर्भात टिळकांनी आपल्या मित्राला लिहिलेल्या पत्रातील पुढील उतारा अगदी स्पष्ट आहे. श्री. पियुष कांती घोष यांनी हे पत्र उद्धृत केले आहे.


टिळक लिहितात: 'मी दोषी आहे अशी कबुली द्यावी अशी दुसऱ्या बाजूची अपेक्षा आहे. मी हे करायला तयार नाही. माझे लोकांमधील स्थान माझ्या शीलावर अवलंबून आहे आणि मी जर माझ्यावर भरलेल्या खटल्यामुळे दबलो, धास्तावलो तर मी महाराष्ट्रात राहिलो काय आणि अंदमानात राहिलो काय, सारखेच आहे...

माझ्यावरील राजद्रोहाच्या खटल्यात काहीच दम नाही असे मला वाटते... राजकारणात काम करताना धोका पत्करावा लागतोच. आमच्या व्यवसायात हे होणारच आणि मी त्याला तोंड द्यायला तयार आहे.

'आपण सर्वजण लोकसेवक आहोत आणि कसोटीच्या क्षणी जर आपण अवसानघात केला तर तो लोकांचा विश्वासघात होईल आणि त्यामुळे लोकांची निराशा होईल... मला जर शिक्षा झाली तर माझ्या देशबांधवांची सहानुभूती हाच माझा त्या प्रसंगातील आधार असेल.'

ज्यूरीने बहुमताने टिळकांना दोषी ठरविल्यावर न्यायमूर्तींनी टिळकांना 'तुम्हाला काही सांगावयाचे आहे काय?' असे विचारले.

त्यावर टिळक म्हणाले, "ज्यूरीला मी दोषी वाटत असेन पण मला स्वत:ला मी निर्दोषी आहे असेच वाटते. राजद्रोहाच्या हेतुपुर:सर हे लेख लिहिलेले नाहीत व त्यांचा परिणामही राजद्रोह



निर्माण करण्याचा होईल असे मला वाटत नाही. लेखातील शब्दांच्या अर्थाविषयी जाणत्या विद्वान अशा लोकांची साक्ष सरकारतर्फेच घ्यावयास पाहिजे होती. ती घेण्यात आली नाही.''

न्या. स्ट्रॅची यावर म्हणाले, ''वाचकांच्या मनात अराज्यनिष्ठा निर्माण करण्याच्या हेतूनेच तुम्ही हे लेख लिहिले आहेत अशी माझी खात्री झाली आहे. तुमची बुद्धिमत्ता व विद्वत्ता लक्षात घेता तुम्ही हे लेख लिहिले ही फार वाईट गोष्ट झाली... मी तुम्हांस फक्त 18 महिन्यांची सक्त मजुरीची शिक्षा देतो.''

टिळकांच्यावरील खटल्यामुळे देशातील सर्व लोक अत्यंत अस्वस्थ झाले होते. खटल्याचा निकाल ज्या दिवशी लागणार होता, त्या दिवशी मद्रासमध्ये काय घडले याचे वर्णन 'हिंदू' या वृत्तपत्राने पुढील शब्दांत केले आहे:

'टिळकांवरील खटल्याच्या निकालाच्या दिवशी दुपारपासूनच लोक मोठ्या संख्येने 'हिंदू' च्या कार्यालयासमोर जमले होते व टिळकांच्या संबंधीच्या बातमीची सचिंत होऊन वाट पाहात होते. ज्यावेळी टिळकांना शिक्षा झाल्याची तार आली त्यावेळी लोकांच्या चेहऱ्यावर जे दुःख आणि काळजी व्यक्त झाली त्याचे वर्णन करता येणे कठीण आहे.'

टिळकांना झालेली शिक्षा ही एक राष्ट्रीय आपत्ती आहे असे देशभर लोकांना वाटले. 1897 सालच्या अमरावती येथील काँग्रेसच्या अधिवेशनात, काँग्रेसचे अध्यक्ष सी. शंकरन् नायर यांनी टिळकांचा आदरपूर्वक उल्लेख करून त्यांना राजकीय कैदी म्हणून वागविण्याऐवजी गुन्हेगार म्हणून वागविण्यात येते याबद्दल नापसंती व्यक्त केली. याच अधिवेशनात बाबू सुरेन्द्रनाथ बानर्जी यांनी, 'टिळकांना झालेल्या शिक्षेमुळे अखिल देश अश्रू ढाळत आहे' असे भावपूर्ण उद्‌गार काढले आणि त्यावेळी सर्व प्रतिनिधी उत्स्फूर्तपणे उभे राहिले.

टिळक दीड वर्षाची शिक्षा भोगीत असताना तुरुंगातील वाईट अन्न आणि कठोर जीवन यांमुळे त्यांची प्रकृती खराब होत चालली होती. वजन कमी होत होते. वृत्तीने मात्र ते आनंदी होते.

सक्तमजुरीची जाचक शिक्षा भोगत असतानाही टिळकांची ज्ञानोपासना अखंड चालू होती. प्रसिद्ध जर्मन पंडित प्रो. मॅक्सम्यूलर यांनी आपण संपादित केलेल्या ऋग्वेदाची प्रत टिळकांना पाठविली होती. टिळक चिकित्सकपणे ऋग्वेदाचा अभ्यास करीत होते. त्यांना मॅक्सम्यूलर यांनी काही ऋचांचा लावलेला अर्थ बरोबर वाटत नव्हता.

'सूर्योदयात प्राक् बहूनि अहानि आसून' या ऋचेचा स्वतंत्रपणे विचार करीत असताना टिळकांच्या मनात अशी कल्पना स्फुरली की सूर्योदयापूर्वी अनेक दिवस गेले अशा अर्थाची ऋचा, ज्या ठिकाणी 6 महिन्यांचा दिवस व 6 महिन्यांची रात्र आहे त्या उत्तर ध्रुवाजवळच लिहिली गेली असावी. आपल्या आर्य पूर्वजांचे मूळ स्थान वरती उत्तर ध्रुवाजवळ असले पाहिजे-हा विचार टिळकांच्या मनात दृढ झाला आणि त्या विषयावर पुढे संशोधन करून ग्रंथ लिहावा, असा त्यांनी मनाशी संकल्प केला.

टिळकांची सुटका व्हावी असे सर्व भारतीयांना वाटत होतेच. परंतु त्यांची सुटका करावी असे ब्रिटिश सरकारकडे निवेदन पाठविले ते मात्र प्रो. मॅक्सम्यूलर, सर विल्यम हंटर आणि अन्य काही देशांतील विद्वानांनी. या निवेदनावर प्रसिद्ध भारतीय इतिहासकार रमेशचंद्र दत्त यांनीही सही केली.

या निवेदनात टिळकांच्या विद्वत्तेची स्तुती करून पुढे म्हटले होते: 'टिळकांच्या ओरायनवरील निबंधावरून असे दिसते की ते एक अत्यंत विद्वान पंडित आहेत आणि हजारो वर्षांपूर्वीच्या गोष्टीत त्यांचे मन विशेष रमत असते. टिळकांसारख्या संस्कृत भाषेच्या

पंडितास व संशोधकास जास्त काल तुरुंगात ठेवू नये अशी विनंती मॅक्सम्यूलर व त्यांच्या सहकाऱ्यांनी ब्रिटिश सरकारला केली होती.

अखेर 11 महिने तुरुंगवास भोगल्यानंतर 6 सप्टेंबर 1898 ला टिळकांची मुक्तता झाली. तुरुंगामध्ये टिळकांची प्रकृती खालावून त्यांचे वजन 135 पौंडवरून 105 पौंडावर आले. नंतर थोडीशी प्रकृती सुधारून त्यांचे वजन 113 पौंडावर आले. सुटल्यानंतर विश्रांतीसाठी ते काही काळ सिंहगडावर जाऊन राहिले.

सिंहगड हे त्यांचे मोठे आवडीचे ठिकाण होते. शिवछत्रपतीच्या कालातील तानाजी मालुसरे यांच्या हौतात्म्यामुळे पवित्र झालेल्या सिंहगडाबद्दल टिळकांना फार मोठा अभिमान वाटत असे. पुण्यामध्ये माणसांची सतत चाललेली वर्दळ, केसरीचे संपादकीय काम आणि अन्य सार्वजनिक काम या रामरगाड्यातही टिळकांचे वाचन चालतच असे.

परंतु सिंहगडावर त्यांना हवी ती शांतता मिळे. तिथल्या मोकळ्या हवेत आणि शांत वातावरणात टिळकांना वाचनलेखनास भरपूर वेळ मिळेच, शिवाय सिंहगडाच्या परिसरातील साध्यासुध्या मावळे लोकांच्या बरोबर बोलण्यातही त्यांचे मन रमत असे. तुरुंगातून सुटल्यावर टिळक सिंहगडावर जाऊन राहिले आणि थोड्याच दिवसांत त्यांची प्रकृती उत्तम सुधारली.

ब्रिटिशधार्जिणी वृत्रपत्रे

टिळकांना शिक्षा पुरी होण्यापूर्वी सोडण्यात आले हे भारतातील टाइम्ससारख्या अँग्लो इंडियन वृत्तपत्रांना आवडले नाही. त्यातच आणखी एका घटनेची भर पडली. टिळकांची सुटका झाल्यानंतर रँड खुनाच्या खटल्यात सरकारला आरोपीची माहिती पुरविणाऱ्या

द्रवीड बंधुंचा वासुदेव चापेकर व रानडे यांनी खून केला. वस्तुतः या घटनेशी टिळकांचा काहीही संबंध नव्हता. परंतु येथील अँग्लो इंडियन वर्तमानपत्रांनी टिळकांच्या शिकवणुकीचा व खुनाचा संबंध आहे असे आडपडद्याने लिहिणे चालू ठेवले.

याच वेळी लॉर्ड नॉर्थकोट याची मुंबई इलाख्याचे गव्हर्नर म्हणून नेमणूक झाली. त्यांना उपदेश करण्याच्या निमित्ताने इंग्लंडमधील कॉंझर्व्हेटिव्ह मताच्या 'ग्लोब' या वर्तमानपत्राने 28 ऑक्टोबर 1899 च्या अंकात पुढील मजकूर लिहिला:

'मुंबई इलाख्यात राजद्रोही मंडळ्यांच्या जाळ्या पसरल्या आहेत. त्यांचा पुढारी टिळक यांस कैदेत ठेवल्यापासून चळवळ कमी असली, तर ती फक्त दबून आहे. कदाचित् टिळक यांनीच सुरू केली नसली तरी, निदान त्यांच्या तंत्राने चालणारी खुनाची मोहीम आता नजरेस आल्यामुळे, गोडबोल्या ब्राम्हणांवर नव्या गव्हर्नरांनी विश्वास तर टाकू नयेच, पण चांगली नजर ठेवावी.'

ग्लोब पत्रातील हा उतारा इंग्लंडमधील लोकमत म्हणून टाइम्सने 18 नोव्हेंबर 1899च्या अंकात प्रसिद्ध केला. टिळकांनी लगेच 23 नोव्हेंबरला टाइम्सवर अब्रुनुकसानीची फिर्याद केली. ना. फेरोजशहा मेथा हे टिळकांचे वकील होते. राजद्रोहाच्या खटल्याच्या वेळी ॲड्व्होकेट जनरलने बाजू मांडताना 'टिळकांचा रँड खुनाशी संबंध नव्हता' अशी कबुली दिली होती, तिचाच आधार घेऊन मेथा यांनी टिळकांची बाजू समर्थपणे मांडली.

दरम्यान फिर्याद दाखल झाली हे कळताच, 'टाइम्स' ने दुसऱ्याच दिवशीच्या अंकात आपली माफी प्रसिद्ध केली. 'या प्रकरणी ग्लोबची व आमची मते एक नाहीत. मजकूर निराधार व अन्यायकारक असून तो छापला गेल्याबद्दल आम्हास वाईट वाटते,' असे या माफीपत्रात लिहिले. अशा रितीने टाइम्सला

जाहीरपणे दिलगिरी व्यक्त करावी लागली. टिळकांनी इंग्लंडमधील 'ग्लोब' या वर्तमानपत्रावरही खटला भरला. 'ग्लोब' ने सुरुवातीस ताणून धरले तरी अखेर 'ग्लोब' ला जाहीर माफी मागावी लागली.

24 नोव्हेंबर 1900 च्या 'केसरी' च्या अंकात ही माफी ठळकपणे छापण्यात आली. टिळकांच्या या नैतिक विजयामुळे त्यांचे राजकीय सामर्थ्य वाढले आणि लोकांचेही त्यांच्यावरील प्रेम शतगुणित झाले.

1900 सालच्या लाहोर येथील काँग्रेसच्या अधिवेशनास टिळक हजर राहिले. त्यावेळी ते व्यासपीठावर चढल्याबरोबर लोकांनी उभे राहून टाळ्यांचा गजर केला आणि टिळकांचा जयजयकार केला. टिळकांची देशभक्ती, त्यांची निर्भय व झुंजार वृत्ती, त्यांची प्रखर बुद्धिमत्ता, निष्कलंक चारित्र्य आणि त्यांचा असीम स्वार्थत्याग यांमुळे केवळ महाराष्ट्रातील लोकांनीच नव्हे तर भारतीय जनतेने त्यांच्या नेतृत्वास मान्यता दिली. यामुळेच यापुढे ते लोकमान्य टिळक म्हणून ओळखले जाऊ लागले.

स्वराज्याची चतु:सूत्री

स्वातंत्र्य संग्रामाची तयारी सर्व मार्गांनी केली पाहिजे, अशी टिळकांची भूमिका होती. जगातील लोकमतावर प्रभाव पाडणारे आणि भारतीयांना देशभक्तीची शिकवण देणारे विवेकानंद, भारताची बाजू इंग्लंडमध्ये सडेतोडपणे मांडणारे गोखले आणि क्रांतीची पूर्वतयारी करणारे श्यामजी कृष्ण वर्मा या सर्वांच्या कार्याचे महत्त्व टिळक जाणत होते.

स्वातंत्र्यासाठी विविध मार्गांनी चाललेल्या प्रयत्नांना टिळकांचा मन:पूर्वक पाठिंबा होता. स्वराज्य हे ध्येय साध्य करण्यासाठी

'साधनानाम् अनेकता' हे सूत्र अवलंबिले पाहिजे, ही टिळकांची भूमिका होती.

स्वातंत्र्यलढ्यास धार आली पाहिजे असे टिळकांना वाटत होते आणि व्हाईसरॉय लॉर्ड कर्झन याच्या अरेरावीमुळे यासाठी अनुकूल संधी प्राप्त झाली. कर्झन हा कडवा साम्राज्यवादी होता आणि भारताबद्दल त्याच्या मनात तुच्छतेची भावना होती. 1900 सालाच्या अखेरीस कर्झन यांनी भारतमंत्र्यांना लिहिलेल्या पत्रात, 'काँग्रेस ही कोसळत चालली असून मी भारतात असताना तिला शांतपणे मरण यावे यासाठी शक्य ते प्रयत्न करावेत अशी माझी महत्वाकांक्षा आहे,' असे उन्मत्तपणाचे विधान केले होते.

साम्राज्यमदाने धुंद झालेल्या कर्झनने एका मागून एक जुलमी कृत्ये केली. या जुलमी राजवटीचे आव्हान स्वीकारले पाहिजे, असे टिळकांना तीव्रतेने वाटले आणि त्यांनी निर्भयपणे कर्झनशी दोन हात करावयास सुरूवात केली. 15 ऑगस्ट 1905 ला टिळकांनी केसरीमध्ये 'आणीबाणीची वेळ' हा तेजस्वी अग्रलेख लिहिला. कर्झन यांनी बंगालची फाळणी करण्याचा निर्धार जाहीर केला होता त्याला उद्देशून हा अग्रलेख होता.

टिळक लिहितात: 'लॉर्ड कर्झन यास सर्व हिंदुस्थानभर रावणाप्रमाणे एकटेच अनियंत्रित नाचावयास हवे आहे... वैभव आणि अधिकार यांच्या मदाने त्यांच्या बुद्धीवर एवढे जबरदस्त आवरण पडले आहे की मदोन्मत्त हत्तीप्रमाणे बंगाली राष्ट्राच्या लोकमतास गवतासारखे ते तुडवून टाकीत आहेत.'

लोकमत प्रखर झाले पाहिजे हा विचार मांडताना टिळक पुढे लिहितात, 'नाक धरल्याखेरीज तोंड उघडत नाही आणि सरकारास झोंबेल अशी जर काही गोष्ट आमच्या हातून घडणार नाही तर सरकारचा दर्प कधीही उतरणार नाही.' बंगालमधील

पुढाऱ्यांनी नुसती भाषणे करून चालणार नाही, सरकार नमेल असा कार्यक्रम हाती घेतला पाहिजे, हा विचार टिळकांनी या अग्रलेखाच्या शेवटी मांडला आहे.

22 ऑगस्टला लिहिलेल्या अग्रलेखात टिळकांनी पुढचे पाऊल काय असावे हे स्पष्टपणे सांगितले आहे. ते लिहितात: 'अरेरावी किंवा शिरजोर अधिकाऱ्यांचे डोळे उघडण्यास त्यांची किंवा विलायतेतील लोकांची विनवणी करण्यापेक्षा अधिक तीव्र उपाय योजला पाहिजे.... *'राष्ट्रीय बहिष्कार'* हा यापैकीच एक उपाय आहे.'

इटली, चीन व अमेरिका या तीन राष्ट्रांनी बहिष्काराचे शस्त्र कसे वापरले हे सांगून टिळक लिहितात, 'प्रजा कितीही दुर्बळ असली तरी धैर्याने, एकजुटीने आणि निश्चयाने शस्त्रावीणही ती भारी होते ही गोष्ट इतिहासप्रसिद्ध आहे.'

राजकीय चळवळ उथळपणाने करून चालत नाही, प्रत्येक पाऊल निर्धाराने पुढे टाकावे लागते ही टिळकांची भूमिका होती. बहिष्काराचा पुरस्कार केल्यावर हे शस्त्र कसे वापरावयाचे हे सांगण्यासाठी टिळकांनी 'बहिष्कार-योग' हा लेख लिहिला. विलायती मालावर बहिष्कार टाकणे ही चार दिवस करावयाची चळवळ नसून तो एक 'योग' आहे हे सांगून भगवद्‌गीतेप्रमाणे 'योगः कर्मसु कौशलम्' असे आचरण लोकांनी केले पाहिजे, हे या अग्रलेखाचे मध्यवर्ती सूत्र आहे.

बंगालची फाळणी

16 ऑक्टोबर 1905 ला बंगालची फाळणी करण्यात आली. बंगाल हा राजकीय दृष्ट्या जागृत प्रांत होता आणि बंगालच्या फाळणीस तेथील जनतेचा तीव्र विरोध होता. फाळणी ही

राज्यकारभाराच्या सोयीसाठी करण्यात आली असे सरकारकडून सांगण्यात आले; परंतु बंगालच्या पुढाऱ्यांनी कर्झन याचा दुष्ट हेतू बरोबर ओळखला.

बंगाली लोकांच्या ऐक्यावर आघात करावा आणि तेथील हिंदू व मुसलमान यांच्यामध्ये कायमची फूट पाडावी या उद्देशाने कर्झनने हे कुटील कारस्थान रचले होते. पश्चिम बंगालमध्ये हिंदू बहुसंख्य होते तर पूर्व बंगालमध्ये मुसलमान बहुसंख्य होते. कर्झनने पूर्वबंगालच्या दौऱ्यात जी भाषणे केली त्यावरून त्याचा दुष्ट हेतू उघड झाला.

ब्रिटिश साम्राज्य कायम टिकविण्यासाठी ''फोडा आणि झोडा'' ही कुटील राजनीती कर्झनने अवलंबिली. परंतु त्याचा डाव यशस्वी झाला नाही. फाळणी केल्याने बंगालमध्ये फूट पडेल असे कर्झन यास वाटत होते. परंतु प्रत्यक्षात घडले उलटेच. फाळणीविरुद्ध सर्व बंगाल एकमुखाने बोलू लागला आणि सर्व बंगाली जनतेची अभेद्य एकजूट होऊन फाळणी-विरोधी चळवळ तीव्र झाली.

बहिष्कार

फाळणीचा निर्णय होण्यापूर्वीच 7 ऑगस्ट 1905 ला कलकत्यामध्ये अभूतपूर्व निदर्शन झाले. त्यावेळी भरलेल्या सभेत ब्रिटिश मालावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेण्यात आला आणि पुढील कार्यक्रमासाठी कृती समितीही नियुक्त करण्यात आली. बंगालमधील चळवळीत सर्व स्तरांतील लोक सामील झाले.


लाल, बाळ आणि पाल

ही चळवळ बंगाल पुरती मर्यादित राहण्याची शक्यता होती परंतु

तिला व्यापक स्वरूप देण्याची दूरदृष्टी जहाल पुढाऱ्यांनी दाखविली. बंगालची फाळणी हा स्थानिक प्रश्न नसून भारतीय जनतेच्या अस्मितेवर झालेला तो आघात आहे ही जाणीव टिळक आणि लाला लजपतराय यांनी देशभर निर्माण केली.

या चळवळीत देशाचे अचूक नेतृत्व केल्यामुळेच लाला लजपतराय, बाळ गंगाधर टिळक आणि बिपिनचंद्र पाल-लाल, बाल आणि पाल-ही त्रयी भारताच्या राजकीय क्षितिजावर तेजाने तळपू लागली.

भारतासारख्या खंडप्राय देशात चळवळ देशाच्या कानाकोपऱ्यात पोचविणे ही सोपी गोष्ट नव्हती. टिळकांनी दूरदर्शीपणाने लोकांच्या क्षोभाला योग्य वळण देण्याचे ठरवून स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण आणि स्वराज्य हा चतु:सूत्री कार्यक्रम देशापुढे ठेवून लोकांना चळवळीत सहभागी करून घेतले.



लाल-बाल-पाल या तीन नेत्यांच्यामुळेच स्वदेशी, बहिष्कार आणि राष्ट्रीय शिक्षण या कार्यक्रमास गती मिळाली. लाला लजपतराय म्हणाले, "स्वदेशी हा आपला देश मुक्त करण्याचा मार्ग आहे, असे मी मानतो. स्वदेशीच्या चळवळीमुळे आपण स्वाश्रयी आणि स्वावलंबी होऊ. स्वदेशीच्या मार्गाने जाण्यासाठी आपल्या देशातील भांडवल, साधनसामग्री, मनुष्यबळ, श्रम आणि अन्य सर्व शक्ती आपल्याला एकत्रित कराव्या लागतील आणि यामधूनच आपल्या देशाचे हित साधता येईल."

बहिष्काराचा पुरस्कार करतांना लो. टिळक आणि बिपिनचंद्र पाल असे सांगत असत की, 'ब्रिटिश मालावर बहिष्कार हे पहिले पाऊल असून, त्या मार्गाने वाटचाल करीत ब्रिटिश राजवटीवर बहिष्कार येथपर्यंत पोचले पाहिजे.'

बहिष्काराच्या चळवळीची सुरुवात एका निदर्शनाने झाली. बंगाली लोकांनी मँचेस्टरच्या कापडाचे गठ्ठे एकत्र करून सार्वजनिक ठिकाणी त्यांची होळी केली. या निदर्शनाचा तरूणांच्या मनावर विलक्षण प्रभाव पडला.

परदेशी कापड हे परकीय सत्तेचे प्रतीक आहे हे तरूणांच्या अंत:करणाला पटले आणि ब्रिटिशांची सत्ता नष्ट करण्याची प्रतिकात्मक सुरूवात ब्रिटिश कापड जाळल्याने होते हे त्यांनी ओळखले.

स्वदेशी

टिळक, लजपतराय व पालबाबू यांनी, लोकांचा असंतोष केवळ नकारात्मक रीतीने व्यक्त होऊन चालणार नाही, हे जाणून स्वदेशीचा जोरदार पुरस्कार केला. अल्पकाळातच स्वदेशी ही घोषणा न राहता, कापडाच्या गिरण्या, साबण व आगपेट्यांचे

कारखाने आणि राष्ट्रीय बँका सुरू करण्यासाठी भांडवल गोळा करण्यात येऊ लागले.

राष्ट्रीय शिक्षणासाठी नवीन शिक्षणसंस्था सुरू करण्यात आल्या. या शैक्षणिक संस्थामध्ये, राष्ट्रीय विचारांचा संस्कार करतांनाच तांत्रिक शिक्षण देण्याचीही सोय करण्यात आली. शिक्षणातून विद्यार्थ्यांचे शील घडवावे आणि त्यांचे शरीरही सुदृढ बनवावे या ध्येयाने प्रेरित होऊन अनेक तरुण शिक्षकाचे काम करू लागले.

बंगालच्या फाळणीविरुद्ध करावयाची चळवळ केवळ बंगालपुरती मर्यादित राहून चालणार नाही, ती देशव्यापी झाली पाहिजे, अशी टिळकांची दूरदृष्टी होती. केसरीमध्ये त्यांनी स्वदेशी बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण या विषयावर अग्रलेख लिहून लोकांना प्रेरणा दिली आणि स्वदेशीचा कार्यक्रम महाराष्ट्रात दृढमूल व्हावा यासाठी अनेक उपक्रमांना उत्तेजन दिले.

1906 साली पंढरपूर येथे कार्तिकी यात्रेच्या प्रसंगी एक मोठे स्वदेशी संमेलन व प्रदर्शन भरविण्यात आले. या कार्यक्रमात टिळकांचा पुढाकार होता. स्वदेशीचा संदेश खेड्यापाड्यापर्यंत गेला पाहिजे हे टिळकांचे उद्दिष्ट होते.

विधायक कार्यक्रमात राजकीय मतभेद नसावेत, यासाठी नेमस्त पुढाऱ्यांनाही याप्रसंगी बोलावण्यात आले आणि टिळकांबरोबर गोखलेही या संमेलनास व प्रदर्शनाच्या उद्घाटनास हजर राहिले.

त्याचप्रमाणे टिळकांनी मुंबईच्या प्रमुख व्यापारी मंडळीना व उद्योगपतीना एकत्र करून स्वदेशी को- ऑपरेटिव्ह स्टोअर्स नावाची लिमिटेड कंपनी काढली. या कामासाठी भांडवल गोळा करण्याकरिता टिळकांनी अनेक गिरणी मालकांना भेटून अडीच लाख रुपये भांडवल गोळा केले. कंपनीच्या पहिल्या संचालक

मंडळात टिळकांच्या बरोबर रतन टाटा, द्वारकादास धरमसी, खटाव मकनजी आदी मंडळी होती.

पैसा फंड

स्वदेशी चळवळीमुळे पूर्वी केलेल्या काही उपक्रमांनाही बळकटी आली. महाराष्ट्रात पैसाफंड हा असा उपक्रम होता. प्रत्येकाने निदान एक पैसा द्यावा आणि त्यातून काही उद्योग सुरू करावा अशी कल्पना होती. या उपक्रमांमुळे अधिकाधिक लोकांना स्वदेशीच्या चळवळीत गुंतवून घ्यावे या उद्देशाने टिळकांनी 'पैसा फंडा'स जोराची चालना दिली. त्यांच्या प्रेरणेमुळे अनेक तरुणांनी पैसा फंड गोळा करण्यात उत्साहाने भाग घेतला.

1905 च्या डिसेंबर महिन्यात बनारस येथील कॉंग्रेस अधिवेशनाच्या वेळी स्वदेशीचे प्रदर्शन भरविण्यात आले आणि टिळकांच्या अध्यक्षतेखाली स्वदेशीच्या प्रचाराची सभा झाली.

राष्ट्रीय शिक्षण

बनारस येथील राष्ट्रसभेच्या या अधिवेशनात राष्ट्रीय शिक्षण व बनारस हिंदू विद्यापीठ या कार्यांना गती मिळाली. पं. मदन मोहन मालवीय यांनी आपली हिंदू युनिर्व्हसिटीची कल्पना मांडली आणि लो. टिळकांनी त्यांना पाठिंबा दिला. हे विद्यापीठ सुरू करण्यासाठी त्यांना नऊ लाख रुपयांच्या देणग्या मिळाल्या. या अधिवेशनाच्या निमित्ताने व नागरी प्रचारिणी सभेच्या वतीने टिळकांचे व्याख्यान झाले.

हिंदुस्थानात अनेक भाषा असल्या तरी सर्वांनी देवनागरी लिपी वापरावी आणि दक्षिण हिंदुस्थानात ही सुधारणा एकदम करणे शक्य नसले तरी प्राथमिक शाळेतील पुस्तके देवनागरीतून

छापावयास सुरुवात करावी, असे टिळकांनी सुचविले. यानंतर राष्ट्रीय शिक्षणाची कल्पना देशभर फैलावली. 1906 पासून कलकत्ता येथे राष्ट्रीय कॉलेज व शाळा सुरू करण्यात येऊन राष्ट्रीय शिक्षण मंडळातर्फे परीक्षा घेऊन पदव्या दिल्या जातील, असे जाहीर करण्यात आले.

पुण्यात महाराष्ट्र विद्याप्रसारक नावाची संस्था होऊन तिच्यातर्फे तळेगावला समर्थ विद्यालय सुरू करण्याचे ठरले. टिळकांच्यापासून प्रेरणा घेऊन प्रो. विजापूरकर यांनी या कामास वाहून घेतले. 'राष्ट्रीय मनोवृत्ती ज्याने निर्माण होईल ते राष्ट्रीय शिक्षण' अशी व्यापक व्याख्या टिळकांनी केली.

अग्निदिव्य

एका बाजूस देशातील जनता सरकारच्या जुलमाविरुद्ध एकत्र होत असतानाच दुसरीकडे काँग्रेसमध्ये जहाल आणि यांच्यातील मतभेद वाढू लागले आणि फूट पडण्याची चिन्हे दिसू लागली.

जहाल आणि मवाळ

1907 च्या डिसेंबर महिन्यात सुरतेस काँग्रेसचे अधिवेशन भरले. या अधिवेशनासाठी वेगवेगळ्या प्रांतांतून जे प्रतिनिधी जमले त्यांना पुढे काय घडणार याचा अंदाज करता आला नाही तरी फाटाफुटीची भीती अनेकांच्या मनात डोकावत होती.

23 डिसेंबरला टिळक सुरतेत आले. त्या दिवशी संध्याकाळी जाहीर सभेत ते म्हणाले, 'मला राष्ट्रीय सभेत फूट पाडावयाची नाही. तंटा करावयाचा नाही. पण कलकत्यास झालेल्या ठरावांची पीछेहाट होऊ द्यावयाची नाही, हा माझा निश्चय आहे.'

परंतु अखेर सुरत येथील काँग्रेसचे अधिवेशन उधळले गेले आणि मवाळ व जहाल यांच्या मधील मतभेद विकोपाला जाऊन काँग्रेसमध्ये फूट पडली.

पहिला बॉम्बस्फोट

टिळकांनी तरुण क्रांतिकारकांना साहसी कृत्य करू नये असा सल्ला

दिला होता. परंतु तरुणांच्या मनाला एखाद्या गोष्टीने पछाडले की भावनेची विवेकावर मात होते. बंगालमध्ये तसेच घडले. किंग्जफोर्ड या न्यायाधीशाने वंगभंग-विरोधी चळवळीच्या दिवसात अनेक तरुणांना फटक्यांची शिक्षा दिली होती; त्यामुळे काही करून किंग्जफोर्डला धडा शिकविला तर अन्य जुलमी अधिकाऱ्यांना दहशत बसेल असे क्रांतिकारक तरुणांना वाटत होते.

या तरुण क्रांतिकारकांच्या हातात एक नवे शस्त्र आले होते. युरोपात बॉम्बची विद्या शिकल्यावर बॉम्ब तयार करण्याचे मॅन्युअल घेऊन पां. म. बापट हे क्रांतिकारक भारतात आले आणि या मॅन्युअलची एक प्रत बंगालमधील क्रांतिकारकांना मिळाली. अरविंद घोष, त्यांचे भाऊ बारिन्द्र घोष यांच्यापासून प्रेरणा घेतलेले क्रांतिकारक तरुण कलकत्त्यातील माणिकताळा या जागेत जमत असत.

या तरुणांच्यामध्ये उल्हासकर दत्त हे एक ज्वलज्जहाल क्रांतिकारक होते. त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी बॉम्ब मॅन्युअलच्या मदतीने बॉम्ब तयार केला. हा बॉम्ब किंग्जफोर्डवर टाकावयाचा असे ठरले आणि ती जबाबदारी खुदिराम बोस व प्रफुल्लकुमार चक्रवर्ती यांच्यावर सोपविण्यात आली.

त्यानुसार मुझफ्फरपूर येथे 30 एप्रिल 1908 ला खुदिराम व प्रफुल्लकुमार यांनी बॉम्ब टाकण्याचे ठरविले. परंतु मोटार ओळखण्यात गफलत होऊन खुदिराम बोस याने टाकलेल्या बॉम्बमुळे दुसऱ्याच मोटारीत बसलेल्या दोन इंग्रज स्त्रिया ठार झाल्या. या खुनाबद्दल पोलीस मागावर असताना प्रफुल्लकुमार चक्रवर्ती याने स्वत:वर पिस्तुल झाडून घेऊन आत्महत्या केली.

खुदिराम बोस यास अटक झाल्यावर त्याने किंग्जफोर्डला मारण्याकरिता आपण बॉम्ब टाकला असा निर्भय कबुलीजबाब दिला आणि किंग्जफोर्ड ऐवजी दोन इंग्रज स्त्रिया हकनाक मारल्या गेल्या

याबद्दल खेद व्यक्त केला. खुदिराम बोस यास फाशी देण्यात आले.

खुदिराम सुहास्य मुद्रेने वधस्तंभाकडे गेला आणि मृत्यूला मिठी मारताना त्याने 'वन्दे मातरम्' चा घोष केला. भारतात हा पहिला बॉम्बस्फोट होता आणि या स्फोटामुळे ब्रिटिश सरकार हादरून गेले. क्रांतिकारकांचे निर्मूलन करण्यासाठी सरकारचे दमनचक्र वेगाने सुरू झाले.

मुझफ्फरपूरला जो बॉम्बस्फोट झाला त्याचे पडसाद देशभर उमटले. केसरीमध्ये या विषयावर टिळकांनी 'देशाचे दुर्दैव' असा अग्रलेख 12 मे रोजी लिहिला. या अग्रलेखात हिंसेचा निषेध होता. परंतु त्याचबरोबर लोकांची स्वातंत्र्याची आकांक्षा दडपण्याचा प्रयत्न केल्यामुळेच हा हिंसाचार भडकला असे मत व्यक्त केले होते.

यानंतर केसरीत प्रसिद्ध झालेले अग्रलेख टिळकांचे सहकारी कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांनी लिहिले होते. 'दुहेरी इशारा', 'बॉम्ब गोळ्याचा खरा अर्थ' आणि 'बॉम्ब गोळ्याचे रहस्य' असे हे तीन अग्रलेख होते. 9 जूनच्या अंकात 'हे उपाय टिकाऊ नाहीत' हा अग्रलेख होता.

पुण्यातील दुसरे वर्तमानपत्र 'काळ' मध्ये त्या वर्तमानपत्राचे संपादक शिवराम महादेव परांजपे यांनीही अग्रलेख लिहिले. 11 जुलै 1908 ला परांजपे यांना अटक झाली. यानंतर आता आपल्याला अटक होईल याची टिळकांना पूर्ण कल्पना होती आणि पुढे कराव्या लागणाऱ्या अग्निदिव्यासाठी त्यांचे मन तयार होते.

24 जुलै 1908 ला सायंकाळी 6 वाजता टिळकांना मुंबईत सरदारगृहात राजद्रोहाच्या आरोपाखाली अटक करण्यात आली आणि डोंगरीच्या तुरुंगात टाकण्यात आले.

या खटल्यात न्यायासनासमोर आपली बाजू मांडताना टिळकांनी कायद्यांच्या अनेक बाजूंवर ज्याप्रमाणे स्वतंत्र बुद्धीने भाष्य केले,

त्याचप्रमाणे त्यांनी आपल्या देशबांधवांसमोरही स्वातंत्र्यलढ्यातील आपली नैतिक भूमिका स्पष्टपणे मांडली.

स्वराज्य मिळविणे हे एक उदात्त ध्येय असून त्यासाठी आपण आयुष्यभर झटलो याबद्दल टिळकांना समाधान वाटत असले तरी हे ध्येय साध्य करण्यासाठी भारतीय जनतेला मोठी चळवळ करावी लागेल याची टिळकांना जाणीव होती; आणि आपण हालअपेष्टा निर्भयपणे सोसल्या तरच ही प्रेरणा आपल्या देशबांधवांना मिळू शकेल, असे त्यांना मनोमन वाटत होते. त्यामुळे सरकारने भरलेल्या राजद्रोहाच्या या खटल्यातून कशीतरी सुटका करून घ्यावी, असे त्यांना मुळीच वाटत नव्हते.

संबंध देश हाच एक मोठा तुरुंग बनत असताना आणखी एका छोट्या तुरुंगात सरकारने डांबले तरी त्याची क्षिती टिळकांना वाटत नव्हती.

टिळकांना आरोपी म्हणून न्यायासनासमोर उभे करण्यात आले होते. परंतु त्याचवेळी या उच्च स्थानावरून दडपशाहीला उत्तेजन देणारे आणि भारताची बदनामी करणारे अँग्लो-इंडियन वृत्तपत्रकार आणि लोकांच्या स्वाभाविक राजकीय आकांक्षा दडपून टाकणारे ब्रिटिश शासनकर्ते हेच खरे दोषी आहेत हे टिळकांना जगासमोर मांडायचे होते.

भारतातील वृत्तपत्रांना लोकांचे राजकीय प्रबोधन करण्याचा मूलभूत हक्क असून तो दडपण्याचा अधिकार परकीय सत्तेला नाही, हे सत्य टिळकांना जगासमोर मांडावयाचे होते.

न्या. दावर यांनी ज्यूरीला उद्देशून साक्षीपुराव्यांचा आणि दोन्ही बाजूंच्या युक्तिवादाचा समारोप केला. न्यायमूर्ती दावर यांचे हे भाषण रात्री आठ वाजेपर्यंत चालले होते.

त्यानंतर आठ वाजून तीन मिनिटांनी ज्यूरीचे लोक

विचारविनिमय करण्याकरिता आपल्या खोलीत गेले, तेव्हा कोर्टात अतिशय गंभीर वातावरण पसरले होते.

न्या. दावर यांच्या समारोपावरून टिळकांना दीर्घ मुदतीची शिक्षा होणार हे स्पष्ट झाले होते. त्यामुळे दादासाहेब खापर्डे, तात्यासाहेब केळकर आणि मंडळी अतिशय खिन्न झाली होती.

मधल्या वेळेत टिळकांना आरोपीच्या पिंजऱ्यातून बाहेर येऊन मित्रांमध्ये बसण्या-बोलण्याची परवानगी असे. त्याप्रमाणे टिळक आपल्या मित्रमंडळीच्यात आले आणि चहा घेताना खापर्ड्यांना म्हणाले, ''दादासाहेब आजचा रंग काही वेगळाच दिसतो. बहुधा काळे पाण्याची शिक्षा होणार. कदाचित हा आपला शेवटचाच एकत्र चहा ठरावयाचा!'' असे म्हणून टिळक मोठ्याने हसले आणि त्यांच्या मनोधैर्याच्या या दर्शनाने तेथील कृष्णच्छाया क्षणभर तरी लुप्त झाली.

नऊ वाजून वीस मिनिटांनी ज्यूरीचे सदस्य परत आले. ते येताच न्यायमूर्तींनी पहिला प्रश्न विचारला, ''तुम्ही निकाल देणार तो एकमताने की भिन्न मताने?'' त्यावर फोरमन यांनी सांगितले की, ''भिन्न मताने... तीनही आरोपांवर आमच्यापैकी सातांचे मत असे आहे की टिळक गुन्हेगार आहेत आणि तीनही आरोपासंबंधी दोघांचे मत असे आहे की टिळक निर्दोषी आहेत.''

यावर न्या. दावर म्हणाले, ''मला आपलाही निर्णय कायद्याप्रमाणे सांगितलाच पाहिजे. तो असा आहे की ज्यूरीच्या बहुमताचा निकाल मी मान्य करतो.''

टिळकांनी यानंतर ''मला काही मुद्दे कोर्टापुढे मांडावयाचे आहेत'' असे म्हणून चौदा मुद्दे वाचले. न्यायमूर्तींनी हे मुद्दे फेटाळून लावले आणि ते म्हणाले, ''तुम्हाला काय सांगावयाचे असेल ते सांगण्याची हीच वेळ आहे.''

त्यावर टिळक उभे राहिले आणि म्हणाले, “ज्यूरीने मला दोषी ठरविले तर खुशाल ठरवो; पण मी गुन्हेगार नाही. लौकिक गोष्टीचे नियंत्रण करणारी अशीही एक शक्ती न्यायपीठाहून वरिष्ठ आहे. कदाचित् ईश्वराची इच्छाच असेल की मला शिक्षा व्हावी आणि मी शिक्षा भोगल्यानेच मी अंगीकारलेल्या कार्याला ऊर्जित दशा पावावी.”

1956 साली लोकमान्य टिळक जन्मशताब्दीच्या वेळी, ज्या हायकोर्टात टिळकांना दावर यांनी दोषी ठरवून सहा वर्षांची शिक्षा ठोठावली त्याच हायकोर्टाच्या इमारतीत टिळकांचे धीरोदात्त उद्‌गार लिहिलेली शिला बसविण्यात आली. न्या. दावर आणि त्यांचे अनुदार उद्‌गार पुसले गेले. ब्रिटिश साम्राज्यही विलयाला गेले. लोकमान्यांचे शब्द मात्र ‘काळाच्या ओघात पुसले न जाणारे ठसे’ म्हणून अमरच झाले!

शेवटी न्या. दावर यांनी टिळकांना सहा वर्षांची काळेपाण्याची शिक्षा सांगितली आणि खटल्याचे काम संपले. त्यानंतर टिळकांना आरोपीच्या पिंजऱ्यातून बाहेर काढून एका बारक्या जिन्यानेच खाली आणले आणि हायकोर्टाच्या पश्चिमेस समुद्राच्या बाजूला तयार ठेवलेल्या मोटारीतून परस्पर तुरुंगात नेले गेले.

दुसरा दिवस उजाडताच टिळकांच्या शिक्षेची वार्ता सर्वांना समजली आणि देशभर दु:खाची छाया पसरली. अनेक जण संतप्त झाले, परंतु लोकांच्या मनातील क्षोभ काही ठिकाणीच प्रकट झाला. मुंबईच्या गिरणी कामगारांनी स्वयंस्फूर्तीने हरताळ पाळला. सरकारने कामगाराना दहशत बसविण्याचा प्रयत्न केला, तेव्हा त्याची प्रतिक्रिया आणखी तीव्र होऊन दंगेधोपे उसळले.

सरकारने हा असंतोषाचा वणवा पसरू नये म्हणून लष्कर आणून निर्घृणपणे अनेक जागी गोळीबार केला. या गोळीबारात चार

दिवसांत पन्नासाहून अधिक लोक मृत्युमुखी पडले आणि अनेक जण जखमी झाले. अनेकांना पकडून नेण्यात आले आणि दंगा केल्याबद्दल एक वर्ष किंवा त्याहून अधिक सक्तमजुरीची शिक्षा त्यांना देण्यात आली. भारतातील कामगार वर्गाने केलेले हे साम्राज्यविरोधी निदर्शन अभूतपूर्वच मानावे लागेल.

मंडाले येथील कारावास

टिळकांना स्पेशल ट्रेनने अहमदाबादेस नेले आणि साबरमती कारागृहात ठेवण्यात आले. पुढे 10 सप्टेंबरला त्यांना मुंबईस आणण्यात आले. बंदरात हार्डिंज नावाची बोट तयार होती. तीत बसविण्यात आले. 22 सप्टेंबरला ते रंगूनला पोहोचले. तेथून त्यांना मंडाले येथे नेण्यात आले. टिळकांना मंडाले येथे नेऊन ठेवल्यापासून त्यांची सुटका होईपर्यंत सुमारे साडेपाच वर्षे गेली.

'टिळकचरित्रा'त या कारावासासंबंधी श्री. केळकर यांनी पुढील वर्णन केले आहे: 'टिळकांचे वास्तुजग म्हणजे त्यांना दिलेली तीन खणांची दुमजली खोली. त्यांचा सहचर म्हणजे त्यांच्या दिमतीला दिलेला आचारी. त्यांच्या भेटीला येणारे लोक म्हणजे तुरुंगाचे अधिकारी किंवा डॉक्टर. टिळकांचे भाचे हे वर्षातून एखाद्या वेळी जाऊन त्यांना भेटून येत. पण त्यांची गाठही तुरुंगाच्या कचेरीतच पडे. टिळकांना घरी दर महिन्याला एक पत्र लिहिण्याची परवानगी असे.'

कौटुंबिक जीवन

शिक्षा सांगितल्यानंतर टिळकांना घरच्या मंडळीनाही भेटू देण्यात आले नाही. टिळकांची कोणत्याही अग्निदिव्यातून जाण्याची तयारी असल्यामुळे आपल्या कुटुंबियांपासून ताटातूट झाल्यामुळे ते विचलित

झाले नाहीत. टिळकांच्या राजकीय व अन्य सार्वजनिक जीवनाबद्दल खूप लिहिले गेले आहे. परंतु त्यांचे कौटुंबिक जीवन मात्र अनेकांना अज्ञातच आहे.

जुन्या वळणाच्या घरात त्या वेळी ज्या तऱ्हेचे कौटुंबिक जीवन असे, तसेच टिळकांचेही होते. टिळकांना भाऊ नव्हताच. एक बहीण होती. तीही दूर, कोकणात असे. त्यामुळे एकत्र कुटुंबपद्धतीच्या त्या काळातही टिळक, त्यांच्या पत्नी सत्यभामाबाई आणि मुले, असे हे लहानसेच कुटुंब होते. राहणी अगदी साधी; आणि सत्यभामाबाई या त्या काळच्या स्त्रियांप्रमाणे पतीच्या छायेत वावरणाऱ्या होत्या. देवदर्शनाव्यतिरिक्त त्या फारशा घराबाहेरही पडत नसत.

टिळकांना घराकडे लक्ष द्यावयास फुरसत नसल्यामुळे त्यांचे भाचे धोंडोपंत विद्वांस हवे-नको ते पाहात असत. मुलांकडेही लक्ष देण्यास टिळकांना धकाधकीच्या राजकीय जीवनामुळे फारशी फुरसत नसे. पण याचा अर्थ त्यांना घराबद्दल मायेचा ओलावा कमी होता असा मात्र नाही. टिळकांच्या काळी पती-पत्नी चार माणसांच्या देखत सहसा बोलत नसत. परंतु त्यामुळे प्रेमाची उत्कटता कमी कशी असू शकेल ?

टिळक ज्यावेळी मंडालेला गेले, त्या वेळी त्यांच्या पत्नी सत्यभामाबाई यांच्या मनावर मोठाच आघात झाला. टिळकांची पन्नाशी उलटली होती. त्यातच त्यांना मधुमेहाचा विकार होता. ते जिवंत परत येतील असे सत्यभामाबाईंना वाटत नसे. त्यामुळे त्या अतिशय विरक्त बनल्या. मंगळसूत्राव्यतिरिक्त कोणताही दागिना त्या घालीत नसत. साधे काळे पातळ परिधान करीत. स्वतःच्या प्रकृतीची हेळसांड करीत. कोणी काही वाचून दाखविले तर त्याकडे त्यांचे फारसे लक्ष नसे. मुलीनी वाचून दाखविलेला 'भक्तिविजय' मात्र त्या भक्तिभावाने ऐकत. सत्यभामाबाई आणि मुले यांच्याबद्धल

लोकमान्यांच्या भावना ज्या मोजक्या शब्दांतून पण तीव्रतेने व्यक्त झाल्या आहेत, ते शब्द पुढीलप्रमाणे:

9 जानेवारी 1909 च्या पत्रात ते लिहितात: 'सौभाग्यवती व मुले यांना म्हणावे, मला माझी काळजी वाटत नाही. त्यांचीच अधिक वाटते. माझी प्रकृती खरोखरीच बरी आहे. त्यांना बरे वाटावे म्हणून उगाच काहीतरी लिहितो असे नाही.मी लवकरच येऊन भेटेन असे त्यांना सांगा. दु:खात आशा हीच जगण्याची जागा. म्हणून ती त्यांची कायम राहील अशी काळजी घ्यावी.'

परंतु ते व्हावयाचे नव्हते. 1992 सालच्या जून महिन्यात सत्यभामाबाई निधन पावल्या. ती तार मिळाल्यावर टिळकांनी जे पत्र लिहिले आहे, त्यातील काही भाग पुढीलप्रमाणे:

'तुमची तार पोहोचली. मनाला फार मोठा जबर धक्का बसला. संकटे आली तर मी शांतपणाने ती सोशीत असतो हे खरे. पण खरेच सांगतो की या बातमीने मी अगदी हादरून गेलो....तिच्या मरणकाळी मी जवळ नाही याचेच फार दु:ख वाटते....माझ्या जीवनाचा एक भाग समाप्त झाला. दुसराही आता लवकरच होईल असे वाटते....

मी नसल्यामुळे मुलांना तिच्या मरणाचे दु:ख अधिकच झाले असेल. माझा म्हणून त्यांना निरोप सांगा की या दु:खामुळे विद्येची हानी होऊ देऊ नका... मुलांना तुमच्याशिवाय दुसरा आधार नाही, म्हणून ईश्वराने तुम्हाला बळ द्यावे. इतक्या दुरून मी तरी त्याला काय अधिक विनवणार?...' या अविस्मरणीय पत्रातून टिळकांच्या उत्कट भावनांचे व उदात्त अंतकरणाचे अपूर्व दर्शन घडते.

टिळक मंडाले तुरुंगात असताना त्यांना स्वयंपाक करून देण्याकरिता येरवडा तुरुंगातून एका कैद्यास पाठविण्यात आले होते. त्याचे नाव वासुदेव रामचंद्र कुलकर्णी. त्याने टिळकांच्या आठवणी सांगताना लिहिले आहे:

'शिक्षा होण्यापूर्वी टिळक महाराजांस मी कधी पाहिले नव्हते. प्रथम त्यांस तेथे पाहून मला फार आनंद झाला. टिळक महाराजांस ज्या कोठडीत ठेवले होते, ती दुसऱ्या मजल्यावर असून दोन खणांची, 20 x 12 फूट होती. माडीखालील दोन खण जागेत स्वयंपाक, स्नान वगैरेंची व्यवस्था करण्यात आली होती. महाराजांचे खोलीत सामान म्हणजे एक टेबल, एक-दोन खुर्च्या, एक कापडी आरामखुर्ची आणि महाराजांस बुकांचा हव्यास दांडगा म्हणून ती ठेवण्यास एकदोन कपाटे, इतके सामान होते. महाराजांस नेहमीचाच पोशाख घालण्याची परवानगी असल्याने धोतरे, सदरे, त्यांची नेहमीची टोपी, पायातील पुणेरी जोडा, अंथरूण-पांघरूण वगैरे किरकोळ सामान असे...

'महाराजांचा नित्यक्रम असा असे. ते पहाटे जरा लवकर उठत. प्रथम पाण्याने चूळ भरून काही संस्कृत श्लोक पुटपुटत. मग अंथरुणावर सुमारे तास दीड तास ध्यानस्थ बसल्यासारखे बसत. मुखमार्ज़न झाल्यावर ते चहा घेत व मग लिहिण्यावाचण्यात गुंग होत. नऊ वाजता ते स्नानास खाली येत. त्यांस स्नानास अतिशय पाणी लागे व तेही अतिशय स्वच्छ लागे...


'प्रथम प्रथम एक वेळ गव्हाचा आटा व एक वेळ तांदूळ त्याखेरीज डाळ, महाराजांकरिता देत. पुढे काही दिवसांनी थोडी फळे देऊ लागले. पुढे वाटेल ते सामान मिळू लागले. महाराजांकरता पुणे येथून घरून पापड, लोणचे, मसाला, घेण्याची परवानगी मिळाली. मी भात, चपात्या, भाजी, एखादी चटणी, कोशिंबीर, करी. महाराज मनापासून सर्व थोडे खात. पण जेवताना त्यांचे अन्नावर काही लक्ष नसे.

'रोज सकाळचे जेवण झाल्यावर ते वर जाऊन दोन खणांत शतपावली करीत आणि पुन्हा त्यांचे लिहिणे-वाचणे सुरू होई.

सायंकाळी पाच वाजता जेवण उरकावे लागे. बरोबर सहा वाजता तुरुंगाच्या नियमाप्रमाणे आमच्या खोल्यांस बाहेरून कुलुपे लावीत. खोलीभोवतालचे आवार सुमारे दीडशे फूट लांब व साठ फूट रुंद होते. तेथे लिंबोणी, आंबे वगैरेंची झाडे होती. एवढ्या जागेतच दिवसा हिंडण्या-फिरण्यास त्यांना परवानगी असे.

'ते मला तुकाराममहाराज, ज्ञानोबा, एकनाथ, रामदासस्वामी, श्रीकृष्ण, राम, शिवाजीमहाराज व कौरव-पांडव, यांच्या गोष्टी सांगत. जगाचा वाटोळा नकाशा त्यांच्याजवळ असे. तो ते मला नेहमी समजावून देत.

'तुरुंगात पहिली दोन वर्षे गेल्यावर त्यांचा मधुमेहाचा मूळचा विकार थोडा थोडा वाढत चालला. म्हणून त्यांनी पुण्यास असताना केलेले पथ्य पुन्हा करावे असे ठरविले. त्याप्रमाणे सत्तू व त्यांस लागेल तेवढे दूध-तूप देण्यात येऊ लागले. सत्तूच्या पिठात नारळाचे खोबरे घालून तुपात केलेल्या त्याच्या पुऱ्या व त्याबरोबर दही एवढेच ते खात असत... त्यांना केळ्याची तुपातली भजी मी करून घाली.



ती त्यांना आवडत. ते म्हणत, ''ही भजी आमच्या मुलांस व धोंडूस फार आवडतील. *पण ती खाण्यास मंडालेला सहा वर्षे काढावी लागतात!...''* महाराज जो भात खात, तोच मी खावा अशी त्यांची मला ताकीद असे...

'महाराजांना वाचण्याचा विलक्षण छंद. त्यांच्याजवळ अनेक मोठमोठे ग्रंथ, पुण्याहून आणवलेले, साठलेले होते. ते अहोरात्र त्यांच्यात गुंतलेले असत. महाराजांचा सर्व वेळ लिहिण्यापेक्षा वाचण्यात व त्याहीपेक्षा कापडी खुर्चीवर पडून सुपारीचे खांड चघळीत, डोळे लहानमोठे करून विचार करण्यात जात असे. मी एकदा त्यांस म्हणालो, ''आपण एकसारखा इतका विचार कसला करता?''

'ते हसत म्हणाले, ''अरे, माणसाच्या डोक्यात ब्रम्हदेवाची सारी सृष्टी मावते आणि त्याची तेथे घडामोड चालू असते...'' पुढे एकदा ते सहज म्हणाले, ''मी शाळेतला विद्यार्थी आहे. ही माडी माझी शाळा, पुस्तके माझे मास्तर आणि तू माझा खेळगडी. येथे मी जर्मन, फ्रेंच, पाली व दुसऱ्याही काही भाषांचा अभ्यास करीत असतो...''

'महाराजांस मधूनमधून साहेबलोक म्हणजे सरकारी अधिकारी भेटण्यास येत. एके दिवशी कलेक्टर, सुपरिटेंडेंट वगैरे मंडळी आली होती. जर्मन भाषेचे ज्ञान महाराजांस बरेच आहे असे त्यांस कळल्यावर एकजण म्हणाले, ''मी माझ्या मुलीस जर्मन शिकविले आहे. तिची तुम्ही थोडी परीक्षा घ्या.''

'मला पाच वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा झाली होती. त्यापैकी तीन वर्षे संपल्यावर उरलेल्या दोन वर्षांपैकी दीड वर्ष महाराजांच्या प्रयत्नाने माफी मिळाली. मला तेथून हलविणार असे दिसू लागले.

त्यावेळी मी महाराजांस म्हणालो, माझी कमी झालेली दोन

वर्षे मला येथेच ठेवा. तुम्हास सोडून मला जावेसेच वाटत नाही... यावर त्यांनी माझ्या मनाची समजूत घालून आपल्या मुलांमाणसांत जाण्यास सांगून मला ठराविक दिवशी आशीर्वादपूर्वक निरोप दिला...

या पाच वर्षे कैदेची शिक्षा झालेल्या वासुदेव रामचंद्र कुलकर्णी या माणसाच्या मनातही टिळकांबद्दल कसा आदर निर्माण झाला होता हे यावरून समजून येते.

गीतारहस्य

मधुमेहाचा विकार जडलेल्या, पन्नाशी उलटून गेलेल्या टिळकांची ज्ञानसाधना मंडालेच्या तुरुंगात अखंडपणे चालली होती. त्यांनी तेथे जी पुस्तके वाचली, त्यांची नुसती यादी वाचूनही मन चकित होते. भगवद्‌गीतेवरील विविध टीकाग्रंथ टिळकांनी पूर्वीच वाचले होते. त्याचप्रमाणे गीतेचा त्यांनी स्वतंत्रपणेही खूप विचार केला होता.

भगवद्‌गीतेची शिकवण लोकांना समजावून सांगावी आणि भारतीय तत्त्वज्ञानाचे उदात्त स्वरूप जगासमोर मांडावे, असे टिळकांना अनेक वर्षे वाटत होते. परंतु राजकीय कार्याच्या धकाधकीत त्यांना ते करणे शक्य झाले नाही.

मंडालेच्या तुरुंगात मात्र त्यांनी भगवद्‌गीतेचा पुन्हा दीर्घकाल विचार केला. फ्रेंच तत्त्वज्ञ कॉन्त, जर्मन तत्त्वज्ञ कांट, नित्शे वगैरेही त्यांनी वाचले आणि भगवद्‌गीतेवर जो ग्रंथ लिहावयाचा, त्याची मनात व्यवस्थित जुळणी झाल्यावर 2 नोव्हेंबर 1910 ला त्यांनी लेखनास सुरुवात केली.

अवघ्या साडेतीन महिन्यांत त्यांनी संपूर्ण गीतारहस्य स्वहस्ते लिहून काढले. 2 मार्च 1911 च्या पत्रात 'मी ज्याला गीतारहस्य म्हणतो ते पुरे झाले' असे टिळकांनी लिहिले असून त्या पत्रात त्यांनी

लिहिले आहे, 'गीता हा व्यावहारिक नीतिशास्त्राचा अध्यात्मज्ञानावर आधारलेला ग्रंथ आहे.'

8 जून 1914 रोजी सकाळी वाजता मंडाले जेलचे सुपरिटेंडट यांनी टिळकांच्या खोलीत जाऊन त्यांना सामानाची बांधाबांध करण्यास सांगितले. मंडालेहून रंगूनला आणल्यावर मेयो नावाच्या बोटीत त्यांना बसविण्यात आले. तेथून ती बोट सोमवारी, 15 जूनला संध्याकाळी मद्रासला पोहोचली.

तेथून एका खास डब्यातून मद्रास मेलने टिळकांना पुण्याकडे आणण्यात आले. हडपसर येथे गाडी थांबवून टिळकांना उतरविण्यात आले आणि मंगळवार ता. 16 रोजी मध्यरात्रीनंतर सुमारे एक घटकेने टिळकांना आणणारी मोटार टिळकांच्या घरासमोर, गायकवाड वाड्यासमोर येऊन उभी राहिली.

यासंबंधी टिळक लिहितात, 'पोलिसांबरोबर मध्यरात्री घरी आलेल्या मालकासही दरवाजा उघडून आत घ्यावे की नाही अशी दारवानास शंका पडली; म्हणून त्याने धोंडोपंतास बोलावून आणले आणि मग सत्तेच्या घरात आमचा प्रवेश झाला.'

रविवार ता. 21 रोजी टिळकांच्या सुटकेबद्दल आनंद प्रदर्शित करण्यासाठी पुण्याच्या नागरिकांची जाहीर सभा गायकवाडवाड्यात भरली. टिळक सभास्थानी येताच 'टिळक महाराजकी जय' असा जयघोष करून लोकांनी स्वागत केले.

पुण्याचे ऋषितुल्य नागरिक श्री. अण्णासाहेब पटवर्धन यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सत्काराला उत्तर देताना टिळक म्हणाले:

"सुख व दु:ख यांत भेद आहे. दु:खाला भागीदार मिळाला असता ते कमी होते. तसे सुखाचे नाही. सुखाला भागीदार मिळाल्यास उलट ते वाढतेच. आज येथे जमलेला समाज व दोन तीन दिवस माझ्या भेटीकरता आलेला जनसमुदाय पाहून माझ्या सुटकेपासून मला जे सुख

झाले असेल, त्याची वाढ सहस्त्रपट नव्हे, लक्षपट झाली आहे...

"आज सहा वर्षांनी मी परत आलो व जेव्हा सर्व परिस्थिती पाहू लागलो, तेव्हा मला वॉशिंग्टन आयर्व्हिंगच्या रिप व्हॅन व्हिंकलची गोष्ट आठवली. तो कित्येक वर्षे झोपेत होता. तो जागा झाला तेव्हा त्याला सर्व सृष्टी नवी दिसू लागली. तशी माझी अवस्था झाली आहे. आज सहा वर्षांत कोणकोणत्या गोष्टी झाल्या, त्यावेळी असलेल्या माणसांपैकी हयात किती व गेली किती, याची मला वार्ता लागू नये अशी माझी व्यवस्था ठेवण्यात आली होती...

"येथे जमलेल्या समाजाने माझे जे स्वागत केले, त्यावरून लोक मला विसरलेले नाहीत असे वाटते. मीही लोकांना विसरलेलो नाही. सहा वर्षांपूर्वी मी आपणांशी ज्या प्रकारे वागलो त्याचप्रकारे व त्याच पेशाने मी यापुढेही वागेन."

सर्वसमावेशक भूमिका आणि व्यापक चळवळ

ऑगस्ट 1914 ला यूरोपमध्ये पहिल्या महायुद्धास सुरुवात झाली. हे युद्ध ब्रिटिश साम्राज्यावरील एक संकट होते आणि म्हणून हिंदुस्थानात असंतोष वाढणे सरकारला इष्ट वाटत नव्हते. टिळक सुटून आल्यावर सरकारने त्यांच्यावर अनेक तऱ्हेचे निर्बंध घातले. परंतु युद्ध सुरू होताच मुंबई सरकारने टिळकांच्या दारावरचा पहारा उठवला.

ब्रिटिशांची अडचण म्हणजे हिंदुस्थानला संधी, हे टिळक बरोबर जाणून होते. या संधीचा नेमका उपयोग कसा करावा, याबाबत बऱ्याच विचारान्ती त्यांनी निर्णय घेतला आणि 27 ऑगस्टला एक पत्रक काढून महायुद्धाच्या बिकट प्रसंगी ब्रिटिश सरकारला पाठिंबा देणे हे युक्त आहे व ते आपण करणार आहोत असे जाहीर केले.

महायुद्ध सुरू झाल्यानंतर या संधीचा फायदा घेऊन आपण स्वातंत्र्य संपादनासाठी निकराचा प्रयत्न करावा असे अनेक क्रांतिकारकांना वाटत होते. त्यांच्यापैकी चिदंबरम् पिल्ले हे लोकमान्य टिळकांना भेटले. त्यांनी टिळकांबरोबर झालेल्या आपल्या भेटीचे वर्णन पुढील शब्दांत केले आहे :

'माझे गुरु (टिळक) मला त्यांच्या खाजगी खोलीत घेऊन गेले. यूरोपधील युद्धासंबंधी आम्ही बोललो आणि जर्मनीतील भारतीय देशभक्तांनी लोकमान्यांना जो निरोप पाठविला होता, त्याची माहितीही त्यांनी मला दिली.

''युद्धकाळात जी संधी निर्माण होईल, तिचा फायदा घेऊन भारतातील स्वातंत्र्यलढ्यासाठी उठाव करावा,'' अशा आशयाचा तो निरोप होता. या निरोपाप्रमाणे कृती करणे शक्य आहे का आणि ती इष्ट ठरेल का याबद्दल आम्ही दोन दिवस चर्चा केली.

'माझे गुरु टिळक म्हणाले की या संदेशामध्ये ज्या तऱ्हेची संधी निर्माण होईल अशी अपेक्षा बाळगली आहे, तशी संधी बहुधा निर्माण होणार नाही. युरोपातील युद्धामुळे भारतात ब्रिटिशविरोधी उठावास अनुकूल वातावरण निर्माण होणे कठीण आहे असे मत टिळकांनी व्यक्त केले.'

महायुद्धामुळे इंग्लंडची परिस्थिती अडचणीची झाल्याचे टिळकांना मान्य होते; परंतु त्या परिस्थितीतही स्वातंत्र्यास आवश्यक असा क्रांतिकारक उठाव होऊ शकणार नाही असे टिळकांचे परिस्थितीबाबतचे निदान होते आणि त्यांनी ते क्रांतिकारकांना स्पष्टपणे सांगितले. युद्धकालातील ब्रिटिशांच्या अडचणीचा फायदा घेऊन, सरकारवर पुरेसा दबाव आणून काही राजकीय हक्क पदरात पाडून घेणे मात्र शक्य होईल असे टिळकांचे मत होते.

टिळक हे ब्रिटिश साम्राज्याचे कडवे विरोधक होते परंतु जर्मनीच्या राज्यकर्त्यांना अनुकूल नव्हते. युद्धकालासंबंधी टिळकांनी लिहिले, 'काळाची घंटा आपल्याला जागृत करून सांगत आहे की भारताला लवकरच चांगले दिवस येतील. ब्रिटिश साम्राज्याला युद्धात भारताच्या मदतीची गरज आहे हे लक्षात घेऊन आपण दबावाचे राजकारण केले पाहिजे.'

होमरुल लीग

यानंतर लो. टिळकांनी होमरुल लीग स्थापन करून होमरुल स्वराज्याच्या मागणीचे जोरदार समर्थन सुरु केले.

23 जुलै 1916 ला टिळकांचा एकसष्टावा वाढदिवस होता. त्या काळातील आयुमर्यादा लक्षात घेता एखादी व्यक्ती साठ वर्षे जगणे ही भाग्याची गोष्ट मानली जाई. त्यातही दीर्घ काळ कारावास आणि सतत धकाधकीचे खडतर जीवन जगलेल्या टिळकांनी साठ वर्षांची आयुमर्यादा ओलांडली याबद्दल त्यांच्या इष्टमित्रांना, अनुयायांना व नातलगांना आनंद होणे स्वाभाविक होते.

या निमित्त टिळकांचा सत्कार करून त्यांना मानपत्र व थैली अर्पण करण्याचे त्यांच्या मित्रांनी ठरविले. अल्पकाळात अपेक्षित रक्कम जवळ जवळ गोळा झाली. टिळकांचे शेकडो मित्र बाहेरगावाहूनही पुण्यास आले.

सत्कारसमारंभ गायकवाडवाड्याच्या पटांगणात 23 जुलैस सायंकाळी झाला. सत्कारसमारंभास हजारो लोक उपस्थित होते. संस्कृत, इंग्रजी व मराठी अशा तीन भाषांतून टिळकांना मानपत्र देण्यात आले. मराठीतील मानपत्रात सुरुवातीस टिळकांनी स्वार्थत्यागपूर्वक केलेल्या देशसेवेचा उल्लेख होता आणि पुढे लिहिले होते :

'आपण अंगीकारलेले लोकसेवेचे व्रत फार कठीण, किंबहुना खडतर होते. आपणांवर आलेल्या संकटाकडे मागे वळून पाहिले असताना कोणाचीही छाती दडपून गेली असती. पण त्या सर्व संकटांना आपण तोंड कसे दिले... आणि शांत मनाने व धैर्याने ती संकटे कशी सोसली हे ध्यानात आणिले म्हणजे फार कौतुक वाटते.'

मानपत्रात कृतज्ञतेची भावना उत्कटपणे व्यक्त केली गेली होती. या कृतज्ञतेचे प्रतीक म्हणून टिळकांना निधी अर्पण केला गेला. उत्तरादाखल टिळकांनी केलेले भाषण त्यांच्या स्वभावास साजेसे धीरगंभीर होते. लोकांनी दाखविलेल्या प्रेमाबद्दल आभार मानून यातून उतराई होणे कठीण आहे असे टिळक म्हणाले.

मानपत्र व निधीचा औपचारिक स्वीकार करताना या रकमेत तुळशीपत्र घालून या रकमेचा ट्रस्ट केला जाईल आणि राष्ट्रकार्यार्थ ती खर्च केली जाईल असे टिळकांनी सांगितले.

ते शेवटी म्हणाले, ''कोणत्याही फळाची अपेक्षा न धरता सर्वांनी या राष्ट्रीय उद्योगास लागले पाहिजे. ईश्वर करो आणि ही प्रेरणा आपल्या सर्वांच्या मनात जागृत होऊन माझ्या डोळ्यादेखत मला तिचे अल्प तरी फळ पाहावयास सापडो एवढीच माझी ईश्वराजवळ प्रार्थना आहे.''

जीवनात सुख आणि दु:ख, प्रकाश व छायेप्रमाणे एकमेकांसमीप वावरत असतात याचा अनुभव टिळकांच्या एकसष्टाव्या वाढदिवशी आला. सकाळी धार्मिक विधी चालू असतानाच पोलीस अधिकारी गायकवाडवाड्यात आले आणि बेळगाव व अहमदनगर येथे त्यांनी केलेल्या भाषणांबद्दल राजद्रोहाच्या खटल्याची नोटीस त्यांनी टिळकांच्यावर बजावली. टिळक यामुळे यत्किंचितही विचलित झाले नाहीत. उलट 'हा सरकारकडचा आहेर आहे' अशा आशयाचे उद्‌गार काढून त्यांनी स्थितप्रज्ञ वृत्तीने संध्याकाळच्या समारंभात भाग घेतला.

दुसऱ्या दिवशी एका मित्रांनी टिळकांना शिक्षा होईल अशी भीती व्यक्त केली, तेव्हा टिळक म्हणाले की, शिक्षा झाली तर तुरुंगात संकल्पित ग्रंथ लिहिता येतील.

टिळकांनी केलेल्या भाषणाबद्दल वीस हजार रुपयांचा वैयक्तिक जातमुचलका (पर्सनल बॉण्ड) द्यावा आणि वीस हजार रुपयांचे दोन जामीन द्यावे असा सरकारी हुकूम होता. जिल्हाधिकाऱ्याच्या या आदेशावर टिळकांनी अपील करावयाचे ठरविले. त्यांच्यातर्फे बॅ. जीना यांनी अपील अत्यंत कौशल्याने चालविले. टिळकांनी केलेली भाषणे आक्षेपार्ह नव्हती असा न्यायमूर्तींनी निर्णय दिला आणि

टिळकांनी जामीन देण्याची आवश्यकता नाही असाही आदेश दिला.

न्यायमूर्तींच्या या निर्णयाचे देशभर स्वागत झाले. गांधीजी हे त्यावेळी 'यंग इंडिया' चे संपादक होते. त्यांनी यंग इंडियात लिहिले, 'भाषणस्वातंत्र्याचा हक्क प्रस्थापित करण्याच्या लढाईत एक मोठा विजय मिळाला आहे. तसेच होमरूलच्या प्रश्नावर मिळालेला हा एक महत्त्वाचा विजय आहे.'

लखनौ येथील अधिवेशन

1916 च्या डिसेंबर महिन्यात लखनौ येथे राष्ट्रीय सभेचे अधिवेशन भरावयाचे होते. बेळगाव येथे मे महिन्यात झालेल्या परिषदेत टिळकांच्या पुढाकाराने राष्ट्रीय पक्षाने राष्ट्रीय सभेत जाण्याचा निर्णय घेतला होता.

लखनौ येथे भरणाऱ्या अधिवेशनात चर्चेसाठी राजकीय सुधारणांचा मसुदा ठेवला जाणार होता. या दृष्टीने नेमस्त पुढाऱ्यांनी आपला मसुदा पाठविला आणि मुस्लीम लीगनेही आपला मसुदा पाठविला. बॅ. बॅप्टिस्टा यांनी होमरूल लीगतर्फे एक मसुदा पाठविला. दीर्घकाळच्या फाटाफुटीनंतर राष्ट्रीय सभेच्या व्यासपीठावर सर्व प्रवाह पुन्हा एकत्र येत होते. त्यामुळे लोकांत मोठा उत्साह पसरला.

राष्ट्रीय पक्षातील जास्तीत जास्त लोकांनी या अधिवेशनास यावे या आवाहनाप्रमाणे महाराष्ट्रातून अनेक जण लखनौच्या अधिवेशनास निघाले. या सर्वांची सोय व्हावी म्हणून 'स्पेशल ट्रेन' काढण्याची व्यवस्था मुंबईच्या डॉ. साठे यांच्या पुढाकाराने करण्यात आली. टिळक या स्पेशल ट्रेनमध्ये होते. वाटेत जागोजाग लोकांनी गाडी थांबवून टिळकांचा उत्स्फूर्तपणे सत्कार केला.

टिळक लखनौला उतरल्यावर स्थानिक लोकांचा उत्साह

शांगेस पोचला. एक मोठी गाडी आणून तिच्यात टिळकांना बसविण्यात आले आणि टिळक 'नको' म्हणत असताना गाडीचे घोडे सोडून तरुण स्वयंसेवकांनी ती गाडी ओढीत नेली. दीर्घ काळच्या देशसेवेनंतर आणि अतुल त्यागानंतर टिळक 'लोकमान्य' झाले.

स्वागताध्यक्ष जगत नारायण यांनी आपल्या भाषणात जहाल आणि मुसलमान हे दोघेही काँग्रेसमध्ये आल्याबद्दल आनंद व्यक्त केला. अधिवेशनाचे अध्यक्ष अंबिकाचरण मुजुमदार आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले, " 1907 साली सुरत येथे काँग्रेसची जी फूट झाली ती आज नऊ वर्षांनी लखनौच्या केसर बागेत पुन्हा जोडली गेली.... यापुढे वृद्धांनी तरुणांना झिडकारू नये आणि तरुणांनी वृद्धांचा उपमर्द करू नये... एकमेकांचे दोष काढीत न बसता ज्या पुढाऱ्यांनी सरकारशी झगडा चालू ठेवला त्यांच्याच पाठोपाठ आपण जाऊ या... आज नऊ वर्षांनी लखनौस आमच्यामध्ये परत आलेले आमचे मित्र टिळक यांचे मी अंतकरणपूर्वक स्वागत करतो."

जमलेल्या सर्व प्रतिनिधींनी टाळ्यांचा कडकडाट करून या स्वागतात सर्वजण सहभागी असल्याचे व्यक्त केले. अधिवेशन सुरू होताना टिळक जेव्हा सभास्थानी आले तेव्हा सर्वांनी उभे राहून त्यांचे हार्दिक स्वागत केले होतेच.

दोन दिवस विषय-नियामक समितीत सुधारणांच्या योजना एकत्र घेऊन कलमवार वाचून निष्कर्षरूप एक नवी योजना सर्वानुमते मंजूर झाली. तीच पुढे काँग्रेस-लीग स्कीम म्हणून ओळखली गेली. या योजनेत स्वराज्याची मागणी करताना देशातील सर्वधर्मीय लोकांचा त्या मागणीस पाठिंबा आहे हे व्यक्त करण्यात आले. मुसलमानांसाठी विभक्त मतदारसंघ करण्याची आणि जेथे ते

अल्पसंख्य असतील तेथे त्यांना त्यांच्या संख्येपेक्षा अधिक जागा देण्याची तरतूद या करारात होती.

विषय नियामक समितीत यासंबंधी खूप वादविवाद झाला आणि तीव्र मतभेदही झाले. पं. मदनमोहन मालवीय यांचा या ठरावास कडवा विरोध होता. समितीत काय घडले हे सी.एस्.रंगा अय्यर यांनी पुढील शब्दांत सांगितले आहे :

''सभेत वादळी चर्चा चालू असताना लो. टिळक हे एखाद्या पर्वताप्रमाणे अचल होते... काँग्रेसने मुस्लिमांपुढे शरणागती पत्करल्यास आपण त्याविरुद्ध ठराव करू, असे पं. मालवीय यांनी हिंदुमहासभावाल्यांना सांगितले होते.

''परंतु सर्वात अधिक धर्मपरायणवृत्तीच्या आणि वेदांवरील अधिकारी-विद्वान असलेल्या लो. टिळकांनी मात्र कराराविरुद्धचा युक्तिवाद फेटाळून लावला... त्यांना असे वाटत होते की मुसलमानांमध्ये राष्ट्राच्या बाहेरील निष्ठेऐवजी राष्ट्रवादी भूमिका निर्माण करण्यासाठी असा करार आवश्यक होता... हिंदू-मुस्लिम ऐक्य लो. टिळक होते म्हणूनच घडून आले.''

लखनौ करार

या संदर्भात बॅ. जीना म्हणाले, ''लो. टिळकांनी हिंदू-मुस्लिम ऐक्य घडवून आणण्यात फार महत्त्वाची कामगिरी करून देशाची थोर सेवा केली. त्यांच्यामुळेच लखनौ करार घडून आला.''

अधिवेशनातील या ठरावावर बोलताना टिळक म्हणाले, ''काही जण असे म्हणतात की हिंदूंनी मुसलमानांना जादा सवलती दिल्या आहेत. मी देशातील सर्व हिंदूंच्या वतीने असे सांगतो की स्वराज्याचे सर्व अधिकार मुसलमानांना दिले तरी आम्हांला त्याचे काही वाटणार नाही. ते अधिकार रजपूतांना दिले अगर हिंदू

समाजातील तळातल्या लोकांना दिले तरी आमची हरकत नाही...

"आम्ही या अधिवेशनात आपसांतील राजकीय मतभेद संपविले असून स्वराज्याच्या मागणीसाठी एका आवाजात, खांद्याला खांदा लावून लढणार आहोत.... संयुक्त प्रांतात आज आपण सर्वजण एकत्र आलो आहोत आणि लखनौत आपल्याला सद्भाग्य मिळाले आहे. (वुई आर युनायटेड इन् युनायटेड प्रॉव्हिन्सेस् आणि वुई हॅव फाउंड लक नाउ इन लखनो)!"

टिळक एका बाजूस सरकारला पाठिंबा देताना लोकांना या मार्गानेही देशसेवा कशी करता येईल हे सांगत होते. सरकारला नेमके तेच नको होते. म्हणून सरकारने टिळकांना पंजाबात जाण्यास बंदी घातली. टिळकांनी यानंतर कर्नाटकात दौरा काढून होमरूलची कल्पना लोकांना समजावून सांगितली. टिळकांना होमरूल लीगसाठी आर्थिक साहाय्य हवे होते. परंतु ते मागताना स्वराज्याची चळवळ व्यापक झाली पाहिजे असा त्यांचा आग्रह असे.

बेळगाव जिल्ह्यात चिकोडी येथे 'स्वराज्यसंघा'च्या (होमरूल लीगच्या) बैठकीत भाषण करताना टिळक म्हणाले, "आमच्या लीगला नुसते पाच हजार रुपये हवे असते तर ते कोणी एकट्यानेही दिले असते. पण मला तसे ते नको आहेत. एकेक रुपया देणारे 5000 लोकच हवे आहेत. त्यात हातांत लेखणी धरणाऱ्या लोकांबरोबर हातांत नांगर धरणारेही लोक पाहिजेत.... 'पाचामुखी परमेश्वर' म्हण आहे. पाच एकत्र आल्याने त्यांच्या तोंडून परमेश्वर बोलू शकतो तर पाच हजार लोक सभासद होऊन स्वराज्य मागू लागले तर त्यांच्या तोंडून परमेश्वर ताबडतोब बोलेल की नाही?...

"पंढरीचा वारकरी, मी पंढरीस मेलो तर मुक्ती मिळाली असे समजतो. तसेच स्वराज्य मागण्यात मृत्यू आला तर देशाला मुक्ती मिळेल असे तुम्ही लोक का समजत नाही?"

निपाणी येथे जैनांच्या समोर भाषण करताना टिळक म्हणाले, "तुमच्या मंदिरात 51 तीर्थंकर असतात, त्याप्रमाणे या देशात तीस कोटी तीर्थंकर निर्माण झाले पाहिजेत. तुम्हा व्यापारी लोकांना धर्माची सय आहे, पण राष्ट्रीय धर्माचे पालन पोषण तुम्ही केले पाहिजे."

पुण्याला स्वराज्य संघाच्या पहिल्या वार्षिक सभेचा समारोप करताना टिळक म्हणाले, "पुढील वर्षात होमरूल लीगचे 50 हजार सभासद झाले पाहिजेत व तितकेच रुपये ही मिळाले पाहिजे."

सत्याग्रह

याच सुमारास गांधीनी बिहारमधल्या चंपारण्य जिल्ह्यात निळीची लागवड करणाऱ्या मजुरांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध सत्याग्रह केला आणि तो यशस्वी झाला.

सत्याग्रह या साधनाचा अवलंब करावा असे अनेकांना वाटू लागले. मवाळांना तो मार्ग बेसनदशीर वाटत होता. सत्याग्रह या साधनासंबंधी केसरीने लिहिले, 'सरकार ज्यावेळी सत्य व न्याय यांची पायमल्ली करते त्यावेळी सरकारने 'कर' म्हटले ते करणे व 'करू नको' म्हटले ते ही करणे हेच सत्यप्रियतेचे व न्यायप्रियतेचे लक्षण मानले पाहिजे.

'पूर्वी स्वदेशी, बहिष्कार, स्वराज्य, यांसंबंधी राष्ट्रसभेत वाद झाला; परंतु अखेर स्वराज्य हे ध्येय मान्य झाले, यावरून जी गोष्ट पूर्वी राष्ट्रीय सभेच्या ध्येयाची झाली तीच आता राष्ट्रीय सभेच्या कार्यकारी साधनांची होणार आहे.' या अग्रलेखातून सत्याग्रह या साधनाचा असा गौरव करण्यात आला.

9 ऑक्टोबरला 'निकराने एकमुखी मागणी करा' हा अग्रलेख टिळकांनी केसरीत लिहून, सर्वांनी स्वराज्याच्या मागणीस एकमुखी

पाठिंबा दिला पाहिजे असे आग्रहाने प्रतिपादन केले. या अग्रलेखात टिळकांनी 'हिंदुस्थानचे स्वातंत्र्य हा मानवजातीच्या हिताचा प्रश्न आहे' असे म्हटले आहे.

12 ऑगस्टला मुंबई प्रांतिक कमिटीची बैठक झाली. बैठकीत सुरुवातीस वादविवाद झाला, परंतु नंतर तडजोड होऊन गांधी, टिळक व चंदावरकर या तिघांनी मिळून पसंत केलेला ठराव मंजूर करण्यात आला. या ठरावान्वये सत्याग्रहास मान्यता देण्यात आली.

स्वराज्य

डिसेंबर महिन्यातील कलकत्ता काँग्रेसचे अधिवेशन संपल्यावर टिळक पुण्यास परत आले. 5 फेब्रुवारी 1918 पासून टिळकांनी वऱ्हाडचा दौरा करून 'स्वराज्य म्हणजे काय व त्यासाठी लोकांनी काय केले पाहिजे' या विषयावर सोळा दिवसांत बत्तीस व्याख्याने दिली.

स्वराज्यसंघाच्या मुंबईच्या बैठकीत टिळकांनी लोकजागृतीसाठी जो दौरा केला त्याचा अहवाल देण्यात आला. टिळकांनी वऱ्हाडात 32 व इतर ठिकाणी 56 अशी 88 व्याख्याने देऊन स्वराज्याची कल्पना लोकांच्या मनात रुजविली.

प्रवास, गर्दी, यांचा टिळकांना त्रास होत असे, परंतु लोकांच्या मनात देशभक्तीची ज्योत प्रज्वलित करून स्वराज्याच्या चळवळीत येण्यास त्यांना चेतना द्यावी, या उद्देशाने जिवाची पर्वा न करता टिळक गावोगाव व्याख्याने देत. त्यांचा असामान्य त्याग, त्यांचे निष्कलंक चारित्र्य, देशहिताची तळमळ आणि साध्या सोप्या भाषेत लोकांना विषय समजावून सांगण्याची हातोटी, यांमुळे लो. टिळकांच्या व्याख्यानांना प्रचंड प्रतिसाद मिळाला.

या व्याख्यानांचे सार त्यांच्याच पुढील शब्दांत देता येईल :

'घरातला कारभार ज्याप्रमाणे आपण चालवितो त्याप्रमाणे देशाचा कारभारही लोकांनी स्वत:च चालविला पाहिजे. हाच स्वराज्य याचा अर्थ आहे. नोकरशाही ही कारभारात मदत करण्यासाठी असते. परंतु ब्रिटिश नोकरशाही मालक बनली आहे. प्रजेच्या गाऱ्हाण्यांकडे लक्ष ती देत नाही. आपण आपले हक्क काय ते समजून घेऊन ते मिळण्यासाठी चळवळ केली पाहिजे. एकजुटीने चळवळ केली तर स्वराज्याचा अधिकार मिळाल्याशिवाय राहणार नाही.'

1918 सालातील मार्च महिन्यात मुंबईत बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली अस्पृश्यता निवारण परिषद भरली. ही परिषद घेण्यात थोर समाजसुधारक विठ्ठल रामजी शिंदे यांनी पुढाकार घेतला होता. अखिल भारतीय स्तरावर एक जाहीरनामा काढून त्यावर देशातील सर्व जातीच्या पुढाऱ्यांच्या सह्या घ्याव्यात असे शिंदे यांना वाटत होते. लोकमान्य त्यावेळी इंग्लंडला जाण्याच्या गडबडीत होते. शिंदे यांनी आग्रह धरल्यावर लोकमान्यांनी परिषदेस जाण्याचे मान्य केले.

काँग्रेसने अस्पृश्य वर्गाचे प्रतिनिधी घेऊन आपल्या कार्यास त्यांचा पाठिंबा मिळवावा अशा अर्थाचा ठराव 25 मार्च 1918 ला लोकमान्यांनी बैठकीत आणला. त्यांच्या भाषणातील काही वाक्ये पुढीलप्रमाणे: 'अस्पृश्यता देवास मान्य असेल, तर मी त्याला देवच म्हणणार नाही...मी येथे जरी आज शरीराने प्रथमच आलो आहे, तरी मनाने या चळवळीत नेहमीच आहे....जुन्या काळी ब्राह्मणांच्या जुलमाने ही चाल पडली हे मी नाकारीत नाही. पण या रोगाचे आता निर्मूलन झालेच पाहिजे.'

इंग्लड येथील दौरा

इंग्लंडमध्ये जाऊन तेथील राजकीय प्रवाहांचे अवलोकन करावे

आणि हिंदुस्थानच्या स्वराज्याच्या मागणीस पाठिंबा देणाऱ्या व्यक्ती आणि राजकीय पक्ष यांच्याशी संबंध जोडावेत ही उद्दिष्टे मनात बाळगून टिळक इंग्लंडला गेले.

स्वराज्याची चळवळ प्रामुख्याने हिंदुस्थानातच उभी राहिली पाहिजे हे टिळक जाणीत होते. परंतु त्याचबरोबर परदेशातून काही मदत मिळविण्याचा प्रयत्न करणाऱ्या व्यक्तीना त्यांचे प्रोत्साहन असे. त्यापेक्षाही परदेशातील आणि विशेषत: इंग्लंडमधील लोकमत हिंदुस्थानला अनुकूल झाले पाहिजे असे त्यांना सतत वाटत असे.

त्याचप्रमाणे हिंदुस्थानचे आर्थिक शोषण ब्रिटिशांकडून कसे प्रचंड प्रमाणात होत आहे आणि त्यामुळे हिंदी जनतेचे दारिद्र्य कसे भयावह बनले आहे, हे जगासमोर येणे आवश्यक आहे असे टिळकांना वाटत होते.

इंग्लंडमधील मजूर पक्षाबद्दल टिळकांना विशेष आस्था वाटत होती. 1907 साली पुण्यातील पुढाऱ्यांच्या निमंत्रणावरून केरहार्डी पुणे येथे आले होते. हे निमंत्रण देण्यात टिळक प्रमुख होते. केरहार्डी हे गरीब, स्कॉच कुटुंबात जन्मलेले. ते प्रथम एका कोळशाच्या खाणीत मजूर होते. स्वकष्टाने पुढे येऊन ते पार्लमेंटचे सभासद म्हणून निवडून आले होते. स्वतंत्र मजूरपक्षाचे ते अध्यक्ष होते. 'लेबर लीडर' नावाचे वृत्तपत्र ते चालवीत असत. हिंदुस्थानातील वस्तुस्थिती पाहून तिचा अभ्यास करावा यासाठी ते हिंदुस्थानात आले होते. टिळकांनी केरहार्डी यांचे हार्दिक स्वागत करून, सार्वजनिक सभेतर्फे त्यांना मानपत्र दिले.

त्या मानपत्रात असे म्हटले होते की इंग्लंडमधील लिबरल पक्षावर अवलंबून न राहता स्वार्थत्याग व स्वावलंबन या मार्गांनीच राष्ट्रीय भवितव्याचा प्रश्न सुटेल असे हिंदी प्रजेस वाटू लागले आहे. मानपत्रात 'हिंदी प्रजेच्या न्याय्य आकांक्षांबाबत आपण इंग्लंडातील

मतदारांची खात्री करावी' अशी विनंती केली होती.

केरहार्डी हे मानपत्रास उत्तर देताना म्हणाले, "हिंदुस्थानाबद्दल माझ्या मनात सहानुभूती होतीच. पण आता ती शतपट वाढली आहे... इंग्लंडमधील हजारांतील .999 माणसे हिंदुस्थानबद्दल अज्ञानात असतात. माझ्या पक्षाच्या परिषदेत तुमची हकीकत मी जरूर सांगेन."

राजकीय दूरदृष्टी

ब्रिटिश पार्लमेंटच्या 1918 सालच्या निवडणुकीस मजूर पक्ष उभा होता. टिळकांनी मजूर पक्षास निवडणूक प्रचारासाठी दोन हजार पौंडांची मदत केली. ही कृती खासच मुत्सद्दीपणाची होती. टिळकांना भविष्यकाळात मजूर पक्ष महत्त्वाचा ठरेल असे वाटत होते आणि म्हणून त्या पक्षाशी जिव्हाळ्याचे संबंध जोडण्यास त्यांनी सुरुवात केली. राजकीय दूरदृष्टी म्हणतात ती हीच.

रौलॅट ॲक्ट

हिंदुस्थानात रौलॅट ॲक्ट पास झाला, तेव्हा 1 मे 1919 ला हाइड पार्कमध्ये मजूर पक्षाची प्रचंड सभा झाली. रौलॅट ॲक्टविरुद्ध ठराव करण्यात आले. पाय मुरगळल्यामुळे टिळकांना सभेस जाता आले नाही. 3 मेच्या मजूर पक्षाच्या सभेस टिळकांना उचलून व्यासपीठावर नेण्यात आले. त्या प्रचंड मोठ्या सभेत त्यांनी प्रभावी भाषण केले.

टिळक 5 जून 1919 ला केंब्रिज येथे गेले आणि तेथील हिंदी विद्यार्थ्यांच्या हिंदी मजलीस पुढे त्यांनी भाषण केले. तेथे टिळकांनी रोखठोकपणे पुढील प्रश्न तरुण विद्यार्थ्यांना केला : 'तुम्ही उच्च प्रतीचे शिक्षण घेऊन आणि स्वतंत्र वातावरणातील विचार घेऊन हिंदुस्थानात येणार. पण केवळ स्वार्थसाधनपर विचार न करता

देशकार्याला वाहून घ्यावयाचे असा निश्चय तुमच्यापैकी किती जणांनी केला आहे?' ऑक्सफर्ड येथील विद्यार्थ्यांच्या समोरही टिळकांचे भाषण झाले.

इंग्लंडमध्ये असताना टिळक आणि बॅ. बॅप्टिस्टा या दोघांनी 'सेल्फ डिटर्मिनेशन' ही पुस्तिका तयार केली. टिळकांनी तिच्या हजारो प्रती इंग्लंडमधील राजकीय पक्ष, कार्यकर्ते, विचारवंत, वृत्तपत्रे, ग्रंथालये आदीना पाठविल्या. हा सर्व खर्च टिळकांनी केला. या पुस्तिकेचा मसुदा बॅ. बॅप्टिस्टा यांनी तयार केला होता. उत्तम इंग्रजी आणि तर्कशुद्ध युक्तिवाद, ही या पुस्तिकेची वैशिष्ट्ये होती. आशयामधून टिळकांची राजकीय भूमिका स्पष्टपणे व्यक्त झाली होती.

पुस्तिकेच्या सुरुवातीस हिंदुस्थानचा एक राष्ट्र म्हणून विचार का केला पाहिजे यासंबंधी पुढील युक्तिवाद केला आहे : 'असा एक मुद्दा मांडला जातो की हिंदुस्थान हे एक राष्ट्र नसून अनेक राष्ट्रांचा तो समूह आहे, एक देश नसून एक खंड आहे. अशा विधानांमुळे सत्याचा विपर्यास होतो आणि जे अज्ञानी असतात त्यांची दिशाभूल होते.'

पुढे हिंदुस्थानात विविधतेत एकात्मता आहे हे सांगितले असून त्या संदर्भात लिहिले आहे, 'ब्रिटनमध्ये ज्याप्रमाणे विविध वर्ग असले तरी या वर्गामुळे ते राष्ट्र विभागले जात नाही त्याचप्रमाणे हिंदुस्थानात अनेक जातीचे लोक असल्याने राष्ट्राची विभागणी होत नाही. भिन्न विचारांमुळे अगर श्रद्धांमुळे राष्ट्र विभागले जात नाही. अशी विभागणी झाली तर धार्मिक सहिष्णुता अस्तित्वातच राहणार नाही.'

पहिले महायुद्ध संपल्यानंतर जी शांतता परिषद पॅरिस मध्ये भरली होती या परिषदेचे अध्यक्ष जॉर्ज केमेंको यांना लो.टिळकांनी 11 मार्च 1919 एक निवेदन पाठविले.

या परिषदेत हिंदुस्थानला प्रतिनिधित्व मिळावे अशी विनंती करताना, हे प्रतिनिधी लोकांनी निवडलेले असावेत, असे टिळकांनी स्पष्टपणे म्हटले आहे. या निवेदनात भारताला स्वत:चे भवितव्य ठरविण्याचा अधिकार (राइट् ऑफ सेल्फ डिटर्मिनेशन) असावा, असे म्हटले असून लोकशाही पद्धतीने देशाचा कारभार चालविण्याची पात्रता आणि क्षमता हिंदी लोकांमध्ये आहे अशी भूमिका मांडली आहे.

निवेदनात म्हटले आहे, 'आशिया खंडात शांतता प्रस्थापित होण्यासाठी आणि जागतिक शांततेच्या दृष्टीने, भारताला अंतर्गत बाबतीत पूर्ण स्वातंत्र्य असणे आवश्यक आहे. जगातील पूर्वेकडील देशांच्या स्वातंत्र्यांचा आधार हिंदुस्थान हा असला पाहिजे.'

मतदानाचा हक्क

इंग्लंडमध्ये जॉइंट पार्लमेंटरी कमिटीसमोर टिळकांनी दिलेली साक्ष हा त्यांच्या इंग्लंडमधील कार्याचा सर्वांत महत्त्वाचा भाग मानावा लागेल. मॉंटेग्यु-चेम्सफर्ड सुधारणा कायद्यातील अपुरेपणा दाखविल्यावर टिळकांनी 'भारताला येत्या पंधरा वर्षात संपूर्ण जबाबदार राज्यपद्धती प्राप्त झाली पाहिजे', असे आग्रहाने प्रतिपादन केले.

ताबडतोबीची सुधारणा म्हणून हिंदुस्थानला प्रांतिक स्वायत्तता देण्यात यावी आणि प्रांताचा सर्व कारभार लोकनियुक्त प्रतिनिधीच्याकडे सोपवावा अशी मागणी टिळकांनी केली. त्याचबरोबर केंद्रामध्येही काही खात्यांचा कारभार लोकप्रतिनिधीकडेच असावा आणि साम्राज्याच्या हितसंबंधाच्या दृष्टीने तूर्त परराष्ट्र संबंधासारख्याच खात्यावर ब्रिटिश सरकारचे नियंत्रण राहावे असे टिळकांनी स्पष्टपणे प्रतिपादन केले.

हिंदुस्थानातील जनता मतदानाचा हक्क जबाबदारीने वापरू शकेल असा आत्मविश्वास टिळकांनी व्यक्त केला आहे. जॉइंट पार्लमेंटरी कमिटीपुढे केलेल्या या निवेदनाच्या शेवटी टिळक म्हणाले, 'लोकांना द्यावयाच्या अधिकारांचा समावेश सुधारणा कायद्यामधील कायदेशीर तरतुदीच्या मध्ये असणे आवश्यक आहे.'

इंग्लंडमधील वास्तव्यात टिळकांनी मजूर पक्षाशी संबंध जोडताना भावी कालात हिंदुस्थानच्या बाजूने या पक्षाचा उपयोग होऊ शकेल अशी अटकळ बांधली होती. परंतु हा केवळ राजकीय अंदाज नव्हता.

टिळक यांनी फेबियन सोशलिस्टांपैकी वेब यांच्याबरोबर स्नेहाचे संबंध जोडले होते. 1917 मध्ये झालेल्या रशियन राज्यक्रांतीकडे टिळकांचे हिंदुस्थानात असताना पुरेसे लक्ष गेले नव्हते असे दिसते. झारच्या जुलूमशाहीचा अंत, इतकाच या घटनेचा अर्थ ते लावीत असावेत.

इंग्लंडमध्ये आल्यावर वेब यांच्यासारख्या समाजवादी विचारवंतांकडून टिळकांना रशियन राज्यक्रांतीसंबंधी खूपच अधिक माहिती मिळाली. यासंबंधी टिळकांनी ताबडतोब मतप्रदर्शन केले नाही. इंग्लंडमधील लोकमताच्या दृष्टीने तसे करणे इष्टही नव्हते. परंतु रशियन राज्यक्रांतीच्या आर्थिक व सामाजिक प्रेरणांचा अभ्यास केला पाहिजे असे लो. टिळकांना खासच वाटले असावे.

लो. टिळकांनी निवडणुकीसाठी मजूर पक्षास दोन हजार पौंड दिले. त्याचप्रमाणे अमेरिकेत हिंदुस्थानची भूमिका समजावून सांगण्यासाठी लाला लजपतराय आणि ना.सु. हर्डीकर यांना पाच हजार डॉलर्स एवढी रक्कम घेऊन पाठविले. लाला लजपतराय यांनी पत्र लिहून, यापैकी काही रकमेचा विनियोग कसा केला हे टिळकांना कळविले. डॉ. हर्डीकरांच्या पत्रात अमेरिकेतील

भारतीयांपैकी हिंदू व मुसलमान या कामकऱ्यांची एकी झाली, असा उल्लेख आहे.

जगातील प्रमुख देशांतील लोकांना भारताची भूमिका समजावी आणि त्यांचा पाठिंबा स्वराज्याच्या चळवळीस मिळावा अशी टिळकांची दृष्टी होती. परंतु केवळ राजकीय भूमिकेवरून ते या प्रश्नाकडे पाहात नव्हते.

या दृष्टीबाबत रवीन्द्रनाथ टागोर लिहितात, 'टिळकांनी आपला प्रतिनिधी माझ्याकडे पाठवून मी इंग्लंडच्या दौऱ्यावर जावे असे सुचवून त्यासाठी पन्नास हजार रुपयांची मदत देण्याचे अभिवचन दिले.

'मला विशेष आश्चर्य हे वाटले की, टिळकांनी असे स्पष्टपणे कळविले की राजकीय प्रचाराची ते माझ्याकडून अपेक्षा करीत नव्हते. मी स्वत:शीच प्रामाणिक राहावे आणि मानवजातीची सेवा करण्याचा जो मार्ग मी स्वीकारला आहे त्या मार्गानेच भारताची सेवा करावी असे सुचविले आहे.

'टिळकांचा हा संदेश हा माझा श्रेष्ठ गौरव होता असे मी मानतो. मी कदाचित त्याला लायक नसेनही. परंतु टिळकांच्या व्यक्तिमत्त्वाचा मोठेपणा या त्यांच्या संदेशात प्रत्ययास आला आणि त्याचा माझ्या मनावर फार मोठा परिणाम झाला.'

भारताच्या भवितव्याविषयीचे लोकमान्यांचे विचार अतिशय विशाल असे होते. स्वातंत्र्याला अनेक पैलू असतात आणि म्हणून वेगवेगळ्या तऱ्हांचे खास गुण अंगी असलेल्या सर्वांना स्वातंत्र्यासाठी करावयाच्या चळवळीत आपापल्या पद्धतीने सहभागी होता येते, हे ते अचूकपणे जाणत होते.

लोकमान्य टिळक इंग्लंडमध्ये असता नागरी स्वातंत्र्य चिरडून टाकणारा रौलॅट ॲक्ट पास करण्यात आला. याची तीव्र प्रतिक्रिया

हिंदुस्थानभर उमटली. गांधीजींनी याविरुद्ध सत्याग्रह करण्याचे ठरविले. पंजाबमध्ये ओडवायर या गव्हर्नरने चळवळ चिरडून टाकण्यासाठी दडपशाहीचे मार्ग अनुसरण्याचे ठरविले. याचेच पर्यवसान जालियनवाला बागेच्या भीषण हत्याकांडात झाले. इंग्लंडमध्ये असल्यामुळे जरी लोकमान्य टिळक प्रत्यक्ष काही करू शकले नाहीत तरी रौलॅट ॲक्टचा त्यांनी निषेध केला.

जालियनवाला बाग प्रकरणामुळे टिळकांना अतिशय चिंता वाटली. मॉंटेग्यु यांची ऑगस्टच्या एका आठवड्यानंतर त्यांनी भेट घेतली. पंजाबात लष्करी कायद्यामुळे लोकांना ज्या राक्षसी शिक्षा ठोठावल्या होत्या, त्या सर्व रद्द करून त्या सर्वांची मुक्तता करावी, असे टिळकांनी मॉंटेग्यु यांना सांगितले.

6 नोव्हेंबरला बोटीने लोकमान्य टिळक आपल्या सहकाऱ्यांसमवेत भारतात यावयास निघाले आणि 26 नोव्हेंबरला मुंबईस येऊन पोचले.

येथे आल्यावर मुंबईत त्यांनी पुढील निवेदन केले :

''आज रिफॉर्म बिलाने दिलेल्या सुधारणा थोड्या असल्या तरी आपल्याला निराश होण्याचे कारण नाही. मजूर पक्षाने आमचे होमरूल बिल पार्लमेंटात आणण्याबद्दल आश्वासन दिले आहे. म्हणून रिफॉर्म बिल अपुरे असले तरी त्याचा त्याग करावा असे नाही.

''आज जे काही मिळाले तेवढे तर पदरात घ्याच. पण तेवढ्याने संतुष्ट होऊन चळवळ सोडू नका. कारण 'संतोषो हरति श्रियम्' ही म्हणच आहे.

''इकडील हकीकती मला सर्व कळाल्या. रौलॅट बिलाविरुद्ध गांधींनी सत्याग्रह सुरू केला. तेव्हा त्यांत भाग घेण्याला मी हजर नव्हतो, एवढेच मला वाईट वाटते.''

टिळक आणि गांधी

लोकमान्य टिळक आणि महात्मा गांधी या दोघांमध्ये हिंदुस्थानला स्वराज्य मिळाले पाहिजे याबद्दल एकवाक्यता होती, परंतु दोघांच्या स्वभावात आणि कार्यपद्धतीतही फरक होता. गांधीजी ज्यावेळी दक्षिण आफ्रिकेतून भारतात परत आले त्यावेळी त्यांनी येथील सर्व थोर पुढाऱ्यांची भेट घेतली. या भेटीबद्दल गांधीजीनी लिहिले, 'टिळक हे मला महासागराप्रमाणे वाटले. परंतु गोखले मात्र गंगेप्रमाणे भासले, गंगामाईने जणु मला हृदयाशी घेतले.'

गांधीजी लखनौ काँग्रेसला हजर राहिले, त्या वेळी लोकमान्यांची लोकप्रियता शीगेस पोचली होती. गांधीजीच्या मनात लोकमान्यांविषयी नितांत आदराची भावना होती, हे त्यांच्या भाषणांतून व लेखनातून सतत व्यक्त होई. लखनौ काँग्रेसनंतर गांधीजी बिहारमध्ये चंपारण्यात गेले. तेथे त्यांनी सत्याग्रहाचे साधन प्रभावीपणे वापरून निळीच्या मळ्यात काम करणाऱ्या हिंदी मजुरांना न्याय मिळवून दिला. लोकमान्यांचा या लढ्यास पाठिंबा होता आणि त्यांनी गांधीजीचे कौतुकच केले.

मात्र गांधीजी हे ज्याप्रमाणे सत्याग्रह हे आपल्या राजकीय जीवनाचे तत्त्वज्ञान मानीत होते, त्यापेक्षा टिळकांची भूमिका वेगळी होती. 'साधनानाम् अनेकता' ही टिळकांची कार्यपद्धती होती. सत्याग्रह हे एक प्रभावी साधन असून काही वेळा त्याचा उपयोग करावा लागेल असे टिळक मानीत असत. परंतु सत्याग्रह हेच एकमेव साधन स्वराज्याच्या चळवळीत वापरावे असे मात्र त्यांना वाटत नव्हते.

1917 च्या डिसेंबर महिन्यात टिळक कलकत्त्यास काँग्रेसच्या अधिवेशनास गेले असता मुंबईच्या सौ. अवंतिकाबाई गोखले यांनी, आपण गांधीचे चरित्र लिहीत असल्याचे कळवून त्या चरित्रास

प्रस्तावना लिहिण्याची लो. टिळकांना विनंती केली. अवंतिकाबाई गोखले यांनी लिहिलेल्या गांधीच्या चरित्रास 1918 साली लोकमान्य इंग्लंडला शिष्टमंडळ घेऊन निघाले असता, खास वेळ काढून प्रस्तावना लिहिली.

या प्रस्तावनेत टिळक म्हणतात, 'म. गांधी यांचे चरित्र बोधपर आणि अनुकरणीय का व्हावे याची कारणे शोधून काढण्यास माझ्या मते फारसे परिश्रम नको आहेत...ज्यामुळे या कर्ममय भूमीत मनुष्याची सभोवतालच्या वस्तुस्थितीवर सत्ता चालू शकते; आणि ज्यामुळे निरनिराळ्या गोष्टीबद्दल केलेल्या प्रयत्नांस सिद्धी होण्याचा संभव उत्पन्न होतो, ते शील व चारित्र्य ज्या उदाहरणांवरून आपल्या प्रत्यक्ष निदर्शनास येईल अशी चरित्रे फारच कमी दृष्टोत्पत्तीस येतात...गांधीच्या चरित्राचे जे काही वैशिष्ट्य आहे ते हेच होय.... महात्मा गांधी यांचे चरित्र सामान्य मनुष्यास खरोखरच आदर्शभूत होण्यासारखे आहे.'

पुढील परिच्छेदात लोकमान्यांनी गीतारहस्यातील निष्काम कर्मयोगाचा सिद्धांत सोप्या शब्दांत सांगून शेवटी लिहिले आहे: 'महात्मा गांधीच्या चरित्रावरून जो काही बोध घ्यावयाचा, त्यापैकी मुख्य बोध हा होय.'

पुढे प्रस्तावनेत लो. टिळकांनी या देशाची सर्व बाजूंनी सुधारणा करण्याकरिता मुख्यत: राजकीय सत्ता आपल्या हाती असली पाहिजे असे सांगून व गांधीजीचे मत असेच आहे असा विचार मांडून देशभक्ताचे कर्तव्य नेमके काय आहे ते सांगितले आहे. परिच्छेदाच्या शेवटच्या वाक्यात लो. टिळक लिहितात: 'हे कर्तव्य गांधी यांनी उत्तम प्रकारे बजावले. त्यामुळेच ते सर्व लोकांच्या स्तुतीस व आदरास पात्र झाले आहेत.'

पुढे गांधीजीच्या असहकाराचे विवेचन करताना लो. टिळक

लिहितात: 'सत्याग्रहाचा हा मार्ग सर्व प्रसंगी, सर्व काळी अवलंबिण्यासारखा असला, तरी तो हरएक प्रसंगी उपयोगात आणावाच किंवा नाही अगर सर्व प्रसंगी तितकाच फलद्रूप होईल किंवा नाही हे सांगणे कठीण आहे. तथापि त्या मार्गाची योग्यता मोठी आहे हे सर्वांस कबूल करावेच लागेल.'

प्रस्तावनेचा समारोप करताना लोकमान्यांनी सत्यनिष्ठा आणि आत्मबल हे गांधीचे दोन लोकोत्तर गुण असून त्यांचे चरित्र वाचल्यामुळे वाचकाच्या मनावर सुसंस्कार घडेल असे म्हटले आहे.

अमृतसर येथील राष्ट्रीय सभेनंतर टिळक पुण्यास परत आले आणि होमरूल लीगची पुर्नबांधणी करण्यास त्यांनी सुरुवात केली. 30 जानेवारी 1920 ला शौकतअली व मुहंमदअली यांच्या सत्काराची सभा मुंबईला झाली. त्या सत्कारसभेत अध्यक्षपदावरून बोलताना लो. टिळक म्हणाले, ''खिलाफतीचा प्रश्न सरकारने मुसलमानांच्या इच्छेप्रमाणे सोडविला पाहिजे.या प्रसंगी आम्ही आमच्या मुस्लिम बांधवांना मदत करण्यास तयार आहोत. मी मुस्लिमांसाठी शक्य ते व सर्व काही करीन.''

27 मे 1920 ला बनारस येथे भरलेल्या अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीच्या बैठकीत गांधीजीनी असहकाराच्या चळवळीचे रणशिंग फुंकले.

23 जुलै 1920 ला लो. टिळकांचा चौसष्टावा वाढदिवस साजरा झाला. त्यानंतर लो. टिळक मुंबईस गेले. तेथे गांधीजीनी त्यांची भेट घेतली. त्यावेळी लो. टिळक असहकाराबद्दल काय म्हणाले, हे गांधीजीनी पुढील शब्दात सांगितले आहे: ''टिळक मला म्हणाले, मला असहकारितेचा कार्यक्रम पसंत आहे. परंतु या मार्गाने जाताना देशातील जनता आपल्याबरोबर किती प्रमाणात येईल याबद्दल मात्र मी

साशंक आहे. असहकाराच्या चळवळीत मी कोणताही अडथळा आणणार नाही. मी तुम्हाला सुयश चिंततो. तुम्हाला लोकांनी प्रतिसाद दिल्यास मीही तुम्हाला उत्साहाने पाठिंबा देईन.''

याच संदर्भात कृष्णाजी प्रभाकर खडिलकर यांच्याशी जे बोलणे झाले, ते खडिलकरांनी एका लेखात नमूद केले आहे. त्यावरून गांधीचे सामर्थ्य लोकमान्य टिळकांनी ओळखले होते, परंतु असहकाराच्या चळवळीत सक्रिय भाग घेण्याबाबत त्यांच्या मनाचा निश्चित निर्णय झालेला नव्हता, असे दिसून येते.

अंत्ययात्रा

20 जुलैलाच लो. टिळकांना थोडासा ताप आला. अंगात थोडा ताप असतानाच दिवाण चमणलाल यांच्याबरोबर ते मोटारीतून बाहेर फिरावयास गेले आणि त्यांनी असहकाराबद्दल त्यांच्याशी चर्चा केली. ते म्हणाले, ''असहकारावर माझा विश्वास आहे, परंतु असहकाराचे स्वरूप काय असावे, हा खरा प्रश्न आहे. आपण लोकांच्या पुढे एक पाऊल असले पाहिजे, पण त्यांच्यापुढे राहाताना फार दूर राहून चालणार नाही.''

भारतातील स्वराज्याची चळवळ एकोप्याने चालली पाहिजे आणि सर्वांना एकत्रित ठेवूनच स्वराज्याच्या दिशेने वाटचाल केली पाहिजे, असे लो. टिळकांनी दिवाण चमणलाल यांना सांगितले.

टिळकांचा ताप कमी होण्याऐवजी वाढू लागला. 27 जुलैस त्यांची शुद्ध हरपली. डॉक्टरांनी औषधोपचाराची पराकाष्ठा केली. टिळक मधून मधून शुद्धीवर येत. त्यावेळी त्यांनी जी वाक्ये उच्चारली ती देशाच्या चिंतेची अगर भवितव्याची होती.

31 जुलैस रात्री त्यांचा अंतकाल जवळ आल्याचे डॉक्टरांनी सांगितले आणि मध्यरात्रीनंतर चाळीस मिनिटांनी, म्हणजे 1

ऑगस्टला लोकमान्यांची जीवनयात्रा संपली. भारताच्या राजकीय जीवनातील एका उदात्त आणि भव्य पर्वाची अखेर झाली.


आधुनिक भारताचे शिल्पकार

लोकमान्य टिळकांच्या मृत्यूनंतर गांधीजींनी लिहिले, 'लोकमान्य टिळक हे आधुनिक भारताचे शिल्पकार होते. भावी पिढ्यांना त्यांचे जीवन स्फूर्तिदायी ठरेल, कारण ते देशासाठीच जगले आणि देशासाठीच त्यांनी आपला देह ठेवला. आपल्या जीवनात त्यांची देशभक्ती, त्यांचा त्याग, त्यांचा साधेपणा आणि त्यांची निर्भयता यांचे अनुकरण करणे म्हणजेच चिरकाल टिकून राहाणारे त्यांचे स्मारक उभारणे होय.'

व्यासंगी विद्वान आणि लोकोत्तर नेते

लो. टिळकांनी मंडालेच्या तुरुंगात असताना 'गीतारहस्य' हा ग्रंथ लिहिला. देशसेवा करीत असताना त्यांनी जे लेखन केले त्यामधून त्यांची असामान्य बुद्धिमत्ता आणि गाढ व्यासंग यांची कल्पना येते. 'मी जर स्वतंत्र हिंदुस्थानात जन्माला आलो असतो तर गणिताचा प्रोफेसर होऊन संशोधन केले असते,' असे लो. टिळक म्हणत असत.

मात्र जोपर्यंत आपले देशबांधव अज्ञानी आहेत तोपर्यंत आपण एकट्याने ज्ञानाच्या क्षेत्रात जगात मान्यता मिळविणे लोकमान्यांना योग्य वाटत नव्हते. म्हणून संशोधनाकडे पाठ फिरवून त्यांनी आयुष्यभर आपल्या लेखणीने, वाणीने आणि कृतीने ही लोकशिक्षण केले.



वैचारिक अधिष्ठान

लोकमान्यांच्या राजकीय विचारांचे खंबीर अधिष्ठान होते. त्यांच्या आधीच्या पिढीतील दादाभाई नौरोजी व न्यायमूर्ती रानडे यांच्याप्रमाणेच टिळकांच्या मनावर मिल आणि स्पेन्सर या पाश्चात्य विचारवंतांचा परिणाम झालेला होता. मात्र त्याचबरोबर आपल्या जुन्या समाजव्यवस्थेची उभारणी ज्या तत्त्वांवर झाली त्यामध्ये वास्तववादी दृष्टिकोन व सामर्थ्य होते असेही त्यांना वाटत होते.

आपल्या समाजजीवनातील सामर्थ्याचे अंत:प्रवाह आणि आधुनिक काळातील नव्या कल्पना या दोहोंचाही उपयोग आपल्या राजकीय चळवळीसाठी केला पाहिजे अशी टिळकांची भूमिका होती. लोकमान्य टिळकांनी एका व्याख्यानात सांगितले की हिंदुस्थानात राष्ट्रभक्ती होती परंतु राष्ट्रवाद ही संकल्पना मात्र लोकांना अपरिचित होती.

आपल्या देशातील लोकांच्या मनातील राष्ट्रभक्ती आणि राष्ट्रवादाचा नवा विचार या दोहोच्याही आधारे राजकीय चळवळ उभारली पाहिजे अशी टिळकांची भूमिका होती. यासंबंधीचे स्पष्ट दिग्दर्शन 'स्वराज्य आणि सुराज्य' या लेखात आले आहे.

राष्ट्रीय ऐक्य

भारतातील भिन्न धर्म, अठरापगड जाती, वेगवेगळ्या जीवनपद्धती - या सर्वांमुळे या देशात ऐक्याची भावना निर्माण करणे, रुजणे कठीण आहे हे लोकमान्यांना ठाऊक होते. त्याचबरोबर असे ऐक्य निर्माण झाले तरच आपला तरणोपाय आहे अशी त्यांची पक्की खात्री पटली होती.

या संदर्भात ते लिहितात: 'आमच्या हिंदुस्थानात पूर्वी छप्पन देश होते असा इतिहास आहे. पण इंग्रज सरकारच्या सार्वभौम

सत्तेखाली हे छप्पन देश मोडून त्यांचा एकजीव किंबहुना एक राष्ट्र होण्याचा समय आला आहे, हे राष्ट्रीय सभेवरून जितके पूर्णपणे व्यक्त होते तितके दुसऱ्या कशावरूनही होत नाही.'

हिंदुस्थानातील लोकांत एक राजकीय आकांक्षा निर्माण केली आणि स्वराज्याशिवाय तरणोपाय नाही असे लोकांना वाटू लागले तर निरनिराळ्या तऱ्हेच्या भिन्नतेवर व भेदांवर मात करता येईल आणि एकात्मता निर्माण होऊ शकेल हे जाणून लोकमान्य टिळकांनी अहोरात्र लोकांना ती शिकवण दिली. हिंदुस्थानात राष्ट्रवाद रुजविण्यासाठी हिंदु-मुसलमान प्रश्न बिकट होऊ न देता सलोख्याच्या मार्गाने तो सोडवला पाहिजे हे त्यांनी जाणले.

ब्रिटिशांनी आपले राज्य टिकविण्यासाठी 'फोडा आणि झोडा' हा मार्ग स्वीकारला होता आणि त्यामुळे हिंदु-मुसलमानांमधील तंटे वाढले होते, हे लोकमान्य टिळकांना लोकांना पटवून देणे आवश्यक वाटत होते. या संबंधाने ते लिहितात : 'प्रत्येक विचारी मनुष्यास असे आढळून येईल की हिंदु, मुसलमान आणि सरकार असे तीन पक्ष घेतल्याखेरीज दंग्याच्या कारणाची नीट उपपत्ती लागत नाही.'

या प्रश्नाकडे पाहण्याचा आपला वास्तव दृष्टिकोन मांडताना टिळक लिहितात - 'हिंदूप्रमाणेच मुसलमानांतही परधर्म सहिष्णुता येणे आवश्यक आहे. हिंदू-मुसलमानांत रोटी-बेटी व्यवहार होण्याइतके धर्मोदासीन्य किंवा धर्मोदार्य कधीही होईल असे आमच्या बुद्धीस वाटत नाही. करिता हिंदू-मुसलमान लोकांनी ज्या नात्याने एकत्र राहावयाचे ते काही अंशी अमेरिकेत निरनिराळ्या जातीचे, धर्मांचे लोक जसे एकत्र राहतात तशा प्रकारचे असले पाहिजे.'

आणखी एका ठिकाणी टिळक लिहितात, 'हिंदू व मुसलमान यांच्यातील तंटे मिटवावयाचे असले तर दोनही लोकांचे सणवार व

उत्सव त्यांस निर्विघ्नपणे करू देण्यास मदत केली पाहिजे. मुसलमान लोकांनी हिंदू लोकांच्या मोहल्ल्यात गायी मारल्या तर मुसलमानास शिक्षा झालीच पाहिजे व कोणीही हिंदू मुसलमान खाटकाच्या घरात शिरून दंगा करून गाय सोडवून आणील तर तोही शिक्षेस पात्र धरला पाहिजे.'

हिंदू व मुसलमानांची एकी झाल्याशिवाय स्वराज्याच्या चळवळीस गती येणार नाही हा मनाचा निर्णय झाल्यावर लोकमान्यांनी राजकीय पातळीवर ही एकी घडवून आणण्याचे प्रयत्न केले आणि या प्रयत्नांमुळे 1916 सालच्या काँग्रेसच्या लखनौ येथे भरलेल्या अधिवेशनात हिंदू-मुसलमान करार झाला. या कराराबद्दल लोकमान्य म्हणाले, "लखनौ येथील अधिवेशनात दोन मुख्य गोष्टी घडल्या : हिंदू-मुसलमानांची एकी झाली आणि उभय पक्षांनी मिळून स्वराज्याची मागणी केली." यावरून हे स्पष्ट होते की टिळक हे हट्टाग्रही नव्हते. परिस्थितीला अनुरूप असे वास्तववादी प्रयोगशील धोरण त्यांनी सतत स्वीकारले.

इंग्रजी राज्यामुळे ऐक्याची भावना हिंदुस्थानात वाढली हे मान्य करताना इंग्रजी भाषेमुळे नोकरशाही व मूठभर सुशिक्षित एकत्र आले या गोष्टीस लोकमान्य टिळक महत्त्व देत नसत. या देशाचा कारभार लोकांच्या भाषेतच चालला पाहिजे व म्हणून त्यांनी डॉ. पट्टाभि सीतारामय्या यांनी मांडलेल्या भाषावार प्रांत रचनेच्या कल्पनेस पाठिंबा दिला.

स्वराज्य म्हणजे सर्वसामान्य माणसाचे राज्य असाच अर्थ टिळकांना अभिप्रेत होता. ते लिहितात : 'रयतेच्या गरजा इंग्रज लोकांपेक्षा आम्हास अधिक चांगल्या कळतात हे जरी खरे असले तरी ते तोंडाने सांगून काही उपयोग नाही. रयतेची दु:खे रयतेनेच सभेत येऊन सांगितली पाहिजेत.'

ही दु:खे लोक आपल्या मातृभाषेतच मांडू शकतील, ही जाणीव ठेवून लोकमान्यांनी भारतीय भाषांची अभिवृद्धी झाली पाहिजे असा सतत आग्रह धरला.

परंतु या भाषाभिमानातून प्रांतीयता वाढेल असे एक वाक्यही त्यांच्या लेखनात वा भाषणात आढळून येत नाही.

ते लिहितात: 'राष्ट्रीय सभेत एकमत होण्यापूर्वी प्रत्येक प्रांतात, त्यापूर्वी प्रत्येक जिल्ह्यात व त्यापूर्वी प्रत्येक खेड्यात एकमत झाले पाहिजे; या नैसर्गिक क्रमाने ज्या दिवशी आमचे प्रयत्न चालू राहतील तेव्हाच आम्ही राजकीय हक्क भोगण्यास खरोखर पात्र होऊ.'

लोकमान्यांचे राजकीय आयुष्य म्हणजे अशा प्रयत्नांची गाथा आहे. त्यांनी देशभर झंझावाती दौरे काढले. सोप्या शब्दांत लोकांना स्वराज्याचा संदेश दिला. सामान्य माणसाच्या अंत: करणात देशभक्तीची ज्योत प्रज्वलित केली.

राष्ट्रवाद ही एक तात्त्विक विचारधारा राहू न देता, 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे व तो मी मिळविणारच' अशी सिंहगर्जना करून देशातील कानाकोपऱ्यात पराक्रम जागृत केला. म्हणूनच त्यांच्या जीवनाचे प्रा. गोवर्धन पारेख यांनी केलेले 'भारतीय राष्ट्रवादाचे शिल्पकार' हे वर्णन अत्यंत समर्पक आहे.

स्वराज्य आणि सुराज्य

परंतु लोकमान्य टिळकांनी भारताला केवळ राष्ट्रवाद शिकविला नाही. या राष्ट्रवादाचे अधिष्ठान लोकसत्ता हे असले पाहिजे ही शिकवणही त्यांनी दिली. 'स्वराज्य आणि सुराज्य' या केसरीतील अग्रलेखात लोकमान्यांनी याचे सविस्तर स्पष्टीकरण दिले आहे.

ते लिहितात: 'जगात शिक्षणाचा जितका अधिकाधिक फैलाव होईल त्या मानाने केवळ स्वदेशी राजा आणि सुव्यवस्थित

राज्यकारभार एवढ्याने लोकांची तृप्ती होणे अधिकाधिक दुर्घट होत जाईल. इतकेच नव्हे तर प्रजासत्ताक राज्याशिवाय खरे स्वराज्यच नाही असे म्हणण्यापर्यंतही लोकांची मजल येऊन ठेपेल आणि स्वराज्याखेरीज दुसरे राज्य सुराज्य होणे नाही, असेही लोकांस वाटू लागेल. स्वराज्य आणि सुराज्य यांचीही अंतिम एकवाक्यता आहे.'

स्वराज्यासाठी न्या. रानडे आणि गोपाळ कृष्ण गोखले यांच्यासारख्या असामान्य बुद्धिमान आणि व्यासंगी लोकांनी केलेल्या कार्याबद्दल टिळकांना आदर वाटत असे. सर्वस्वाचा त्याग करून अपार हाल अपेष्टा सोसणाऱ्या आणि बलिदानही करणाऱ्या पराक्रमी क्रांतिकारकांच्या बद्दल टिळकांच्या मनात प्रेम आणि आदर होता.

परंतु स्वराज्यासाठी केवल अशा असामान्य व्यक्तींनी प्रयत्न करणे पुरेसे नाही; असंख्य लोकांनी स्वातंत्र्याच्या चळवळीत भाग घेतला पाहिजे आणि देशव्यापी जनआंदोलन झाले पाहिजे असे त्यांना वाटत असे, तो त्यांचा आग्रहच होता.

म्हणूनच सर्व सामान्य माणसांना झेपेल असा स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण आणि त्यातून स्वराज्य असा चार कलमी कार्यक्रम त्यानी देशासमोर ठेवला आणि त्याची कार्यवाही करून दाखविली. 1918 साली गांधीजी रौलॅट ॲक्ट विरुद्ध सत्याग्रह करून स्वातंत्र्य चळवळीस व्यापक रूप देत आहेत अशी लो. टिळकांची खात्री पटली आणि म्हणूनच त्यांनी गांधीजींच्या सत्याग्रहास पाठिंबा दिला.

लो.टिळक आयुष्यभर देशासाठी चंदनाप्रमाणे झिजले, परंतु त्यांना स्वतःच्या कार्याबद्दल कधी अहंकार वाटला नाही. मातृभूमी स्वतंत्र होण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करणे हे आपले कर्तव्यच आहे असे टिळकांना वाटे आणि हे कर्तव्य करतांना त्यांनी सर्व हाल अपेष्टा आनंदाने सोसल्या. देशसेवेतच मन गुंतले असल्यामुळे

टिळक स्वत:चा फारसा विचार ही करीत नसत.

त्यांचे खाणे, कपडे, एकूणच त्यांची राहणी अगदी साधी होती. चैन, डामडौल यांचा त्यांना तिटकारा असे. ते वागण्यात सरळ पण सडेतोड आणि बोलण्यात फटकळ होते. त्यांच्या साधेपणामुळे लोकांना त्यांच्याबद्दल प्रेम आणि जवळीक वाटे आणि म्हणूनच अनेक जण त्यांना 'तेल्या-तांबोळ्यांचे पुढारी' म्हणत.

टिळकांनी सार्वजनिक काम करतांना कौटुंबिक संकटानाही तोंड दिले आणि मित्राला दिलेला शब्द पाळतांना एका प्रकरणी त्यांना कारण नसताना फार सोसावे लागले. 1897 साली टिळकांच्या वरील राजद्रोहाचा खटला चालू असताना त्यांचे मित्र बाबामहाराज पंडित हे फार आजारी पडले. टिळकांनी पंडित यांना, त्यांच्या मृत्युपत्रा प्रमाणे सर्व व्यवस्था केली जाईल, असे अभिवचन दिले आणि मृत्युपत्राची कार्यवाही करण्याची जबाबदारी विश्वस्त म्हणून घेण्याचे मान्य केले. पंडित यांचे त्याच दिवशी निधन झाले. पंडित यांना मुलगा नसल्यामुळे मृत्युपत्रात लिहिल्याप्रमाणे त्यांच्या पत्नी ताईमहाराज यांनी त्यांच्या नात्यातीलच एक लहान मुलगा दत्तक घ्यावा असा निर्णय कार्यकारी विश्वस्त म्हणून टिळकांनी घेतला आणि रीतसर धर्मशास्त्राप्रमाणे व कायद्याप्रमाणे हे दत्तविधान ही झाले.

पुढे काही विघ्नसंतोषी लोकांनी हे दत्तविधान झालेच नाही आणि टिळकांनी जे केले ते बेकायदेशीर आहे असा आरोप करून टिळकांवर दिवाणी व फौजदारी खटला भरला. 1903 साली खालच्या कोर्टाने टिळकांना दोषी ठरवून दीड वर्षाचा कारावास आणि दोन हजार रुपये दंड अशी शिक्षा सांगितली. टिळकांनी या निकाला विरुद्ध अपील केले आणि हायकोर्टाने त्यांना अपहाराच्या आरोपातून मुक्त केले. परंतु न्यायमूर्तींनी, टिळकांनी आपल्या हक्काचा दुरुपयोग केला असेही निवाड्यात म्हटले.